- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

दैनिक

# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, १६ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २१७ | किंमत : २ रूपये

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# सोनम वांगचुकांची प्रकृती खालावली

## उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष, दिल्ली हायकोर्टाकडून सरकारला नोटीस

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
थ्री इंडियट चित्रपटात आमीर खानने ज्यांची भूमिका साकारली ते सोनम वांगचुक थ्री इडियट चित्रपटाच्या माध्यमातून देशाच्या घराघरात पोहोचले आहेत. तर, रॅमन मॅगसेसे पुरस्कार पटकावल्याने त्यांचं कार्य देखील देशाला परिचीत आहे. मात्र, देशात झालेल्या नीट पेपर फुटीच्या घटनेविरोधात शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सध्या दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर त्यांचं आमरण उपोषण सुरू आहे.



गेल्या १८ दिवसांपासून त्यांनी अन्नत्याग केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. गेल्या १८ दिवसात त्याचं वजन ८ किलोहून अधिक कमी झालं आहे. मात्र, सरकारने अद्याप कुठलीही दखल न घेतल्याने आता हे आंदोलन थेट कोर्टात पोहोचलं आहे.
सोनम वांगचूक यांच्या प्रकृतीची चिंता व्यक्त करत ठाकरेंच्या शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनीही सोनम वांगचूक यांना फोन करुन उपोषण मागे घेण्याची विनंती केली. तसेच, अनेकांकडून वांगचूक यांच्या प्रकतीची काळजी व्यक्त करत उपोषण मागे घेण्याची विनंती केली जात आहे. तर, दिल्लीतील वकील राकेश कुमार सैनी यांनी वांगचूक यांनी उपोषण सोडावं म्हणून जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेत वांगचुक यांचा 'जीव वाचवण्यासाठी सरकारकडून तातडीनं दखल' घेण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. आता, न्यायालयाने याचिकेवर सुनावणी करताना केंद्र सरकारला नोटस बजावली आहे.

**काय म्हटलंय याचिकेत?**
सोनम वांगचुक यांच्यासाठी तातडीने वैद्यकीय उपचार, जीवनरक्षक मदत आणि आवश्यक पोषण पुरवण्याची मागणी याचिकेत करण्यात आली. त्यासोबतच सरकारने त्यांच्या आंदोलकांशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा सुरू करावी, जेव्हा एखाद्या व्यक्तीचा जीव धोक्यात असतो, तेव्हा सरकार गप्प बसू शकत नाही. शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे किंवा उपोषण करणे हा नागरिकांचा अधिकार आहे, परंतु त्याचवेळी आपल्या नागरिकांचा जीव वाचवणे ही सरकारचीही जबाबदारी आहे, असेही याचिकेत म्हटले आहे.

### न्यायालयाने मागितले उत्तर

दरम्यान, दाखल याचिकेवर न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली सरकारकडून उत्तर मागितलं असून न्यायालयाने या प्रकरणाची तातडीने दखल घेत उद्या याप्रकरणाची सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, आता या सुनावणीकडे देशाचे लक्ष लागले असून सरकार उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाची दखल घेणार का, त्यांच्याशी चर्चा करणार का हे पाहावे लागेल.

### थोडक्यात

## मराठवाड्यात काही भागांत पाऊस

**छ. संभाजीनगर :** आठवडाभराच्या विश्रांतीनंतर मराठवाड्यातील काही भागांनंतर राज्यात बऱ्याच ठिकाणी आज पावसाने हजेरी लावली. यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. छ. संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, जिल्ह्यातील काही भागांत बुधवारी दुपारी पाऊस झाला. तसेच लातूर जिल्ह्यातही काही ठिकाणी हलक्या सरी कोसळल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यातच मोठ्या पावसाची प्रतीक्षा असून, आता पाऊस झाल्यास कोवळ्या पिकाला दिलासा मिळणार आहे. मागच्या आठ दिवसांपासून राज्यातून पाऊस गायब झाला होता. त्यातच मराठवाड्यात तर सर्वसाधारण पाऊस झालेला असतानाच अचानक गायब झाला. त्यामुळे बऱ्याच भागांत अद्याप पेरणी रखडली आहे. मोजक्याच शेतकऱ्यांनी साधारण पावसावर पेरणी केल्याने कोवळी पिकेही करपत आहेत. अशावेळी बुधवारी काही भागांत आकाशात ढग दाटून आले आणि आठवडाभराच्या विश्रांतीनंतर पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात काही भागांत आज दमदार पाऊस झाला. यासोबतच बीड जिल्ह्यातही केज, अंबाजोगाई तालुक्यात पावसाने हजेरी लावली.
अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ, वरपगाव, राडी, सातेफळ आणि कानडी परिसरात आज दुपारी वाऱ्यासह पावसाने जोरदार बॅटिंग केली.याशिवाय परभणी जिल्ह्यातही जिंतूर तालुक्यात पाऊस झाला आहे. त्यातच लातूर जिल्ह्यातही आज दुपारी ढग दाटून आले होते. परंतु काही भागांत हलक्याशा सरी कोसळल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या असून, लवकरच दमदार पाऊस कोसळेल, अशी आशा आहे.

## दै. सिंहवाणी वृत्तचे मुख्य संपादक अजय बिवडे यांना 'अजेय लेखणी सन्मान-२०२६' पुरस्कार प्रदान

### आर्यारवी एन्टरटेन्मेंटतर्फे मुंबई येथे पार पडला भव्य पुरस्कार वितरण सोहळा




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपुरातून प्रकाशित होणाऱ्या दैनिक सिंहवाणी वृत्तचे मुख्य संपादक अजय बिवडे यांना पत्रकारिता व लेखन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'अजेय लेखणी सन्मान-२०२६' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार मुंबईतील सुरेंद्र गावसकर हॉल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथे आर्यारवी एन्टरटेन्मेंटतर्फे आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.
मागील १७ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असलेल्या अजय बिवडे यांनी विविध दैनिके व वृत्तपत्रांमधून निर्भीड, अभ्यासपूर्ण आणि समाजाभिमुख पत्रकारितेचा ठसा उमटविला आहे. सध्या ते भारत सरकारमान्य पीआरजीआय प्रेस असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत असून, दैनिक शिवघोषचे संपादक पदाची जबाबदारी पार पाडत आहेत.
या पुरस्कार वितरण सोहळ्यास ज्येष्ठ कवी व गझलकार अरुण म्हात्रे, विसूभाऊ बापट, श्रीधर कीर, वैभव कदम आणि सुनील शिर्के यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.
अजय बिवडे यांची 'अजेय लेखणी सन्मान-२०२६' पुरस्कारासाठी झालेली निवड ही त्यांच्या पत्रकारिता, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची पावती असल्याची भावना व्यक्त करत आर्यारवी एन्टरटेन्मेंटचे अध्यक्ष महेश्वर तेटांबे तसेच समन्वयक गुरूनाथ तिरपणकर यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या भावी पत्रकारिता, साहित्य आणि सामाजिक कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## अमरकंटक मंदिराचे सोने-चांदी गायब

**वृत्तसंस्था, शहडोल**
आई नर्मदेच्या उगमस्थान असणाऱ्या अमरकंटक येथील उगम मंदिरातील दान आणि देणग्यांच्या व्यवस्थापनात गंभीर अनियमितता झाल्याचे आरोप समोर आले आहेत. यामुळे प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुख्य उगम मंदिराला दानात मिळालेल्या सोने-चांदीचा कोणताही रेकॉर्ड उपलब्ध नाही असा आरोप आहे.
मंदिर ट्रस्टचा दावा आहे की, देणगीत मिळालेले सोने-चांदीचे दागिने अमरकंटक पोलिस ठाण्यात जमा केले जातात आणि त्याची पावती ट्रस्टकडे आहे. मात्र, पोलिस ठाण्याच्या टीआयचे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे मंदिराची कोणतीही देणगी येत नाही. नर्मदा उगम मंदिराचे संचालन स्थानिक नगर परिषदेमार्फत होते, परंतु परिषदेकडे ट्रस्टचे बायलॉज (नियम) उपलब्ध नाहीत. यामुळे दानाची मोजणी, दागिन्यांचे संरक्षण आणि इतर प्रक्रियांचे स्पष्ट नियम नाहीत. श्री नर्मदा मंदिर उगम ट्रस्टची स्थापना २००१ साली झाली होती. ट्रस्टवर मंदिर संचालन, बांधकाम, दानपेट्यांमधील रक्कम आणि सोने-चांदीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. अलीकडील खुलास्यानंतर त्याच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**सोने-चांदीचे रेकॉर्ड उपलब्ध नाही**
ट्रस्ट १० दानपेट्या चालवतो. यात मुख्य मंदिर, कार्तिक स्वामी, राम मंदिर, अकरा रुद्र मंदिर, उद्गम स्थळ, विष्णू मंदिर आणि माईच्या बागेतील दानपेट्यांचा समावेश आहे. मंदिर व्यवस्थापनानुसार, ट्रस्टच्या खात्यात १.४१ कोटी रुपये जमा आहेत. सन २००१ पासून आतापर्यंत दानात मिळालेल्या सोने-चांदीचा संपूर्ण रेकॉर्ड उपलब्ध नाही. २०२१ पासून व्यवस्था सांभाळणारे कर्मचारी गणेश पाठक यांच्या मते त्यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर यादी तयार करण्यात आली, परंतु जुन्या रजिस्टरमधील नोंदी स्पष्ट नाहीत. त्यामुळे मंदिरातील एकूण दागिन्यांची संख्या आणि तपशील स्पष्ट नाही. राम मंदिर चोरी प्रकरणानंतर समितीने नवीन दागिन्यांची फोटोसह नोंदणी सुरू केली, परंतु जुने रेकॉर्ड अजूनही अपूर्ण आहेत.

**बँक लॉकरऐवजी पोलिस ठाण्यात**
सामान्यतः मंदिरांचे मौल्यवान दागिने बँक लॉकरमध्ये सुरक्षित ठेवले जातात, परंतु अमरकंटक मंदिराचे दागिने पोलिस ठाण्यात जमा केले जातात. ही व्यवस्था कधी आणि कोणत्या आधारावर सुरू झाली, याची माहिती ट्रस्टचे कोषाध्यक्ष आणि सीएमओ चैन सिंह परस्ते यांना नाही. त्यांनी मान्य केले की, सोने-चांदीच्या एकूण नोंदीची स्पष्ट माहिती त्यांच्याकडे नाही. दागिने कधी आणि कोणाच्या उपस्थितीत पोलिस ठाण्यात पाठवले जातात, याची प्रक्रिया देखील रेकॉर्डमध्ये नाही.

## ऑस्ट्रेलियात मोदींना अपशब्द बोलले

**मेलबर्न :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अलीकडील ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान मेलबर्नमध्ये खलिस्तान समर्थक आणि भाजप समर्थक शीख यांच्यात संघर्ष झाला. खलिस्तान समर्थक पंतप्रधानांना अपशब्द बोलताना ऐकू आले. याचा एक व्हीडीओही समोर आला आहे. हा व्हीडीओ भाजप समर्थक शीख जगविंदर विर्क यांनी १५ जुलैच्या सकाळी त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर केला.
व्हायरल झालेल्या व्हीडीओमध्ये काही खलिस्तान समर्थक पंतप्रधान मोदींविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी करत खलिस्तान जिंदाबादच्या घोषणा देताना दिसत आहेत. सतलज चित्रपटावरील बंदीवरून हा वाद सुरू झाला, त्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी दोन्ही गटांना वेगळे करून परिस्थिती शांत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी ८ ते १० जुलै दरम्यान ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर होते. यावेळी ९ जुलै रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात युरेनियम सहकायार्बाबत महत्त्वाच्या करारावर सहमती झाली. मेलबर्नमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्यातील बैठकीनंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत दोन्ही देशांनी संरक्षण, व्यापार, ऊर्जा, अंतराळ आणि महत्त्वपूर्ण खनिजे (क्रिटिकल मिनरल्स) यासह अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याशी संबंधित करारांची घोषणा केली.

## वरोरा तालुक्यात फत्तापूरच्या अवैध उत्खननवर महसूलमंत्र्यांचे कठोर कारवाईचे आदेश!

### अधिकाऱ्यांसह सर्वांवर निश्चित होणार सामूहिक जबाबदारी रॉयल्टीच्या पाचपट दंड आकारण्याच्या सूचना

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
वरोरा तालुक्यातील फत्तापूर येथील सर्व्हे नं. १८० व लगतच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अवैध खनिज उत्खनन करून शासनाच्या महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या अवैध उत्खननाची गंभीर दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी, यात दोषी आढळल्यास खाणकाम व्यावसायिकासह तलाठी, तहसीलदार ते प्रांताधिकारी अशा सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर 'सामूहिक जबाबदारी' निश्चित करून कारवाई केली जाईल, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.
वरोरा मतदार संघाचे आमदार करण देवतळे यांनी याबाबतची बैठक आयोजित केली होती. मंत्रालयात महसूलमंत्र्यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**१३ महिन्यात तब्बल ३३ हजार ब्रासचे उत्खनन**
उपलब्ध आकडेवारीनुसार, दोन हजार ब्रासचा परवाना असताना, ऑक्टोबर २०२४ ते ९ २०२५ऑक्टोंबर या कालावधीत फत्तापूर परिसरात तब्बल ३३ हजार ब्रास अतिरिक्त व अवैध उत्खनन करण्यात आले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर दिवसाढवळ्या उत्खनन सुरू असताना महसूल विभागाचे स्थानिक अधिकारी आणि प्रशासन काय करत होते? असा संतप्त सवाल महसूलमंत्री बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे.

**पाचपट दंडाची मागणी आणि मंत्र्यांचा इशारा**
"अवैध उत्खननामुळे शासनाचे नुकसान झाले असेल, तर केवळ खाणकाम व्यावसायिकच नाही, तर त्या क्षेत्राशी संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, प्रांताधिकारी आणि सर्व संबंधित अधिकारी याला जबाबदार राहतील. ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असेल आणि कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही," असा इशारा महसूलमंत्र्यांनी दिला आहे.

## देशात चांदीपुरा व्हायरसची दहशत



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
महाराष्ट्राच्या शेजारील गुजरातमध्ये चांदीपुरा व्हायरसमुळे पुन्हा चिंता वाढली आहे. गेल्या काही आठवड्यांत या विषाणूमुळे तीन लहान मुलांचा मृत्यू झाला असून चार मुलांवर उपचार सुरू आहेत. याशिवाय आठ संशयित रुग्णांचे अहवाल अद्याप आलेले नाहीत. सर्व रुग्ण १० वर्षांखालील असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधण्यास सांगितले आहे.
गुजरातचे आरोग्यमंत्री प्रफुल्ल पानशेरिया यांनी सांगितले की, या विषाणूवर नियंत्रण मिळवण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष उपाययोजना सुरू केल्या आहेत. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या मदतीने राज्यातील बालरोगतज्ज्ञांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
आरोग्य विभागाने सर्व सरकारी आणि खासगी डॉक्टरांना संशयित रुग्ण आढळल्यास तातडीने रुग्णालयात दाखल करण्यास सांगितले आहे. मुलांना आवश्यक असल्यास ऑक्सिजन आणि व्हेंटिलेटरची सुविधा त्वरित उपलब्ध करून देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. लहान रुग्णालयांमधून गंभीर रुग्णांना मोठ्या रुग्णालयात तात्काळ हलवण्यास सांगण्यात आले आहे. गुजरातमध्ये २०२४ मध्ये ६१ ठिकाणी चांदीपुरा व्हायरसचे रुग्ण आढळले होते. त्यावेळी आरोग्य विभागाने डास आणि वाळूमाशींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी धुरीकरण, फवारणी आणि जनजागृती मोहीम राबवली होती. या उपायांनंतर त्या भागांत नवीन रुग्ण आढळले नसल्याचा दावा सरकारने केला आहे.

### चांदीपुरा व्हायरस म्हणजे काय?

चांदीपुरा व्हायरसचा शोध सर्वप्रथम महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील चांदीपुरा गावात लागला होता. त्यामुळे या विषाणूला चांदीपुरा व्हायरस हे नाव देण्यात आले. हा विषाणू डास, गोचीड आणि वाळूमाशी यांच्या माध्यमातून पसरतो. त्यामुळे लहान मुलांना याचा धोका अधिक असतो. चांदीपुरा विषाणूमुळे फ्लू सारख्या लक्षणांसह ताप येतो आणि त्यामुळे तीव्र एन्सेफलायटीस देखील होऊ शकतो. हा विषाणू रॅबडोविरिडे कुटुंबातील वेसिक्युलोव्हायरस प्रजातीचा आहे. डास, गोचीड आणि माश्यांसारख्या वाहकांद्वारे याचा प्रसार होतो.

### पालकांनो, मुलांची काळजी कशी घ्यावी?

- मुलांना डास आणि माशांपासून दूर ठेवा.
- पूर्ण बाह्यांचे कपडे घाला.
- घर आणि परिसर स्वच्छ ठेवा.
- ताप किंवा इतर लक्षणे दिसताच तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- डासांची पैदास होणार नाही, याची काळजी घ्या.

संपादकीय लेखणीतून...

## भारतीय रखुमायांचे दर्शन

इंग्लंडचे जगप्रसिद्ध लॉर्ड्स मैदान क्रिकेटची पंढरी मानले जाते. या मैदानावर खेळण्यास मिळावे आणि विठ्ठलाचे दर्शन घडावे असे प्रत्येक क्रिकेटपटूंचे स्वप्न असते, अनेकांना विजयरूपी विठ्ठलाचे दर्शन घडतेच असे नाही, विठ्ठल तो आला आला, मला भेटण्याला असे होतेच असे नाही. पण सोमवारी लॉर्डस्वर अवचित घडले. साऱ्या जगाला भारतीय रखुमायांचे दर्शन मात्र घडले. लॉर्डस्वर डौलाने तिरंगा फडकत होता तेव्हा क्रिकेटचा देव ही टाळ्या वाजवत होता. कारण क्रिकेटच्या पंढरीवर भारतीय पोरींनी इंग्लंडच्या घरात घुसून इंग्लिश पोरींना बदडले होते. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय महिला संघाने ऐतिहासिक कामगिरी नोंदवली होती. लॉर्डस्वर प्रथमच महिलांचा कसोटी सामना आयोजित करण्यात आला होता. या लढतीत भारताने यजमान इंग्लंड संघाचा २७० धावांनी धुव्वा उडवला. भारतीय महिलांनी इंग्लंडमध्ये आजवर एकही कसोटी गमावलेली नाही. इंग्लंडमधील १० कसोटी सामन्यांत भारताने ३ विजय मिळवले तर ७ लढती अनिर्णीत राखल्या आहेत. १४२ वर्षांपूर्वी लॉर्डस्वर पुरुषांचा पहिला क्रिकेट सामना खेळवण्यात आला होता. जुलै १९७६ मध्ये येथे महिलांचे मर्यादित षटकांचे आंतरराष्ट्रीय सामने आयोजित करण्यास सुरुवात झाली.

मात्र लॉर्डस्वर महिलांच्या कसोटी सामन्यांना डावलले जायचे. पुरातन-परंपरावादी इंग्लंडमध्ये काल-परवापर्यंत लॉर्डस्च्या पॅव्हेलियनमध्ये महिलांना प्रवेशबंदी होती. अलिकडे इंग्लिश माणूस थोडासा माणसाळला आहे. इंग्लंड-ऑस्ट्रेलिया यांच्यातील महिलांचा अॅशेस सामनादेखील आजवर लॉर्डस्वर झाला नव्हता. अखेर ही कोंडी फुटली. १९७६ मध्ये लॉर्डस्वर झालेल्या महिलांच्या पहिल्या एकदिवसीय सामन्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त यंदा येथे कसोटी सामना खेळवण्यात आला. भारतीय महिलांना या लढतीत खेळण्याची संधी मिळाली. या लढतीनिमित्त इंग्लंडच्या ५० माजी महिला क्रिकेटपटूंचा गौरव करण्यात आला. सोमवारी भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडचा दुसरा डाव ६२.५ षटकांत १८६ धावांत गुंडाळला. फिरकीपटू स्नेह राणाने ४ तर दीप्ती शर्मा, क्रांती गौड व सायली सातघरेने २ बळी घेतले. पहिल्या डावात भारताने २८५ पर्यंत मजल मारली होती तर क्रांतीच्या ५ बळींमुळे इंग्लंडचा डाव १७० धावांत गुंडाळला गेला होता. दुसऱ्या डावात यास्तिका भाटियाच्या शतकाच्या जोरावर भारताने ३४१ धावांचा डोंगर उभा करत इंग्लंडला विजयासाठी ४५७ धावांचे अशक्यप्राय आव्हान दिले होते. इंग्लंडतर्फे सोफी एक्लेस्टोनने अर्धशतकी खेळी करत कडवी झुंज दिली परंतु ती इंग्लंडचा पराभव टाळू शकली नाही. पहिल्या डावात ५ बळी घेणा-या क्रांती गौडला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. भारत टी-२० विश्वचषकाचा गतविजेता आहे.

परंतु यंदा भारतीय संघाला अपयशाचा धनी व्हावे लागले होते. यंदाच्या विश्वचषकात भारतीय संघाला उपान्त्य फेरीही गाठता आली नव्हती. ते अपयश बाजूला सारून भारतीय संघाने कसोटी सामन्यात मुसंडी मारली. मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदारच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. हरमनप्रीतने सपोर्ट स्टाफचे आभार मानले असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना खेळपट्टीवरील बदलांचा अंदाज घेणे सोपे झाले असे म्हटले आहे. भारताने दिलेल्या ४५७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना तिसऱ्या दिवशी इंग्लंडचे ५ खेळाडू बाद झाले होते. चौथ्या दिवशी भारतीय गोलंदाजांसमोर इंग्लंडचे फलंदाज ९० मिनिटांपेक्षा जास्त काळ तग धरू शकले नाहीत. इंग्लंडच्या एमी जोन्सला ५४ धावांवर स्नेह राणाने बाद करत भारताला दिवसातले पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर सोफी एक्लेस्टोनने वाँगसोबत काही काळ प्रतिकार केला. दीप्ती शर्माने वाँग आणि बेलला लागोपाठ बाद करत इंग्लंडचे शेपूट गुंडाळले. स्नेह राणाने एक्लेस्टोनला बाद करताच भारतीय संघाने मैदानात जल्लोष सुरू केला. सामन्याच्या चौथ्या दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी क्रिकेटचा गॉड सचिन तेंडुलकरने भारतीय संघाला मार्गदर्शन केले होते. भारताच्या ऐतिहासिक विजयाचा पाया स्मृती मानधना आणि यास्तिका भाटियाने रचला. यास्तिकाने तिसऱ्या दिवशी संस्मरणीय शतक ठोकले. अर्थात तिला दैवाची साथही मिळाली. खरे तर यास्तिकाला अर्धशतकी मजलही मारता आली नसती. कारण एक चेंडू तिच्या बॅटची कड घेऊन स्टम्पवर आदळला होता पण बेल्स पडल्या नव्हत्या. गोलंदाजीत क्रांती गौडची कामगिरी विसरता येणार नाही. पहिल्या डावात ५ आणि सामन्यात एकूण ७ बळी घेणाऱ्या गौडने आणि यास्तिकाने लॉर्डस्च्या मानद फलकावर आपले नाव कोरले आहे. वेगवान गोलंदाज गौड आणि सायलीने खेळपट्टीवरील उताराचा प्रभावी वापर करत इंग्लंडच्या गोलंदाजांपेक्षा सरस कामगिरी केली तर फिरकीपटू राणाने इंग्लिश संघाला कायम दबावाखाली ठेवले. पहिल्या डावावर भारतीय संघाला ११५ धावांची आघाडी मिळाली होती. इथेच इंग्लिश संघाचे अर्धे अवसान गळाले होते. यास्तिकाने लॉर्डस्वर ऐतिहासिक शतक ठोकले. कसोटीमधील तिचे हे पहिलेच शतक. लॉर्डस्वर शतक ठोकणारी ती पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली. भारतीय महिला संघाने लॉर्डस्वर २७० धावांनी ऐतिहासिक विजय मिळवला. हा विजय महिला क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल यात शंका नाही.

# वैश्विक इंधनाची नाडी: होर्मुझवरील नियंत्रणासाठी रस्सीखेच

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

होर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात तीव्र लष्करी आणि राजकीय रस्सीखेच सुरू आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये अमेरिका-इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर सुरू झालेल्या युद्धादरम्यान, दोन्ही देशांनी या अत्यंत महत्त्वाच्या व्यापारी जलमार्गावर आपला हक्क सांगण्यास सुरुवात केली आहे. जून २०२६ मधील तात्पुरती युद्धबंदी मोडीत निघाल्यानंतर हा संघर्ष आता शिगेला पोहोचला आहे.

जागतिक व्यापारी जहाजांच्या सुरक्षेचे कारण देत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझची नाकेबंदी करत सुरक्षा शुल्क घेण्याची घोषणा केली होती. इराणने मात्र हा दावा फेटाळून लावत, या जलमार्गावर केवळ आपलाच अधिकार असल्याचे घोषित केले आहे आणि आखातात अमेरिकेचा हस्तक्षेप मान्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. या नियंत्रण युद्धापायी अमेरिका-इराणमध्ये हवाई आणि क्षेपणास्त्रांचे हल्ले होत आहेत.

इराणने काही व्यापारी जहाजांवर कारवाई करून हा मार्ग बंद केल्याचे घोषित केले, तर अमेरिकन लष्कराने या मार्गावरील वाहतूक सुरू असल्याचा दावा केला आहे.

होमुर्जवर नियंत्रण राखण्याची रस्सीखेच ही प्रामुख्याने इराण आणि अमेरिका यांच्यातील भू-राजकीय आणि सामरिक संघर्षाची स्थिती आहे. होर्मुझची समुद्रधुनी हा जगातील सुमारे १/५ तेलाच्या पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा सागरी मार्ग आहे. या रस्सीखेचेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत चढ-उतार होत आहेत. जहाजांच्या विम्याच्या खर्चात प्रचंड वाढ झाल्याने जागतिक व्यापारावर मोठा ताण आला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी ही जागतिक इंधनाची खरी नाडी आहे. या अरबी समुद्र आणि पर्शियन आखाताला जोडणाऱ्या ३९ किमी रुंद पट्ट्यातून दररोज जगातील २० टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होते.

**अमेरिकेची भूमिका आणि 'गार्डियन' बनण्याची घोषणा:** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या बंदरांची पुन्हा नाकेबंदी करण्याची घोषणा केली आहे.

तसेच, अमेरिका या सामुद्रधुनीचा रक्षक बनेल आणि येथून जाणाऱ्या व्यापारी जहाजांच्या सुरक्षेच्या बदल्यात त्यांच्याकडून २०% सुरक्षा कर वसूल करेल, असे ट्रम्प यांनी जाहीर केले आहे. यूएस सेंट्रल कमांडने इराणच्या किनारपट्टीवरील रडार यंत्रणा, क्षेपणास्त्र आणि ड्रोन तळांवर सलग अनेक रात्री तीव्र हल्ले केले आहेत, जेणेकरून जहाजांवर होणारे इराणी हल्ले रोखता येतील. अमेरिका व्यापारी जहाजांना ओमानच्या किनारपट्टीजवळील दक्षिण मार्गाचा वापर करण्याचा सल्ला देत आहे.

**इराणचा प्रतिकार आणि ऐतिहासिक मालकीचा दावा:** इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेचा दावा फेटाळत, "इराणच होर्मुझचा कायमचा रक्षक आहे" असे स्पष्ट केले आहे. इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' ने होर्मुझ सामुद्रधुनी अधिकृतपणे बंद करण्याची घोषणा केली असून, इराणच्या परवानगीशिवाय किंवा त्यांनी ठरवून दिलेल्या मार्गाव्यतिरिक्त जाणाऱ्या जहाजांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

**व्यापारी जहाजांवर हल्ले:** इराणने ओमानच्या सागरी हद्दीतून जाणाऱ्या संयुक्त अरब अमिरातीच्या दोन तेलवाहू जहाजांवर क्रूझ क्षेपणास्त्रांनी हल्ले केले, ज्यामध्ये दुर्दैवाने एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला आहे.

**प्रतिहल्ले:** अमेरिकेच्या कारवाईला उत्तर म्हणून इराणने बहरीन (जिथे अमेरिकेचे ५ वे नौदल दल आहे), कुवेत आणि जॉर्डनमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर ड्रोन आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा मारा केला आहे.

### जागतिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम

होर्मुझ सामुद्रधुनीतून जगातील एकूण खनिज तेलाच्या २५% आणि नैसर्गिक वायूच्या २०% वाहतूक होते. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज सुमारे २ कोटी बॅरल कच्चे तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांची वाहतूक होते, जे जागतिक तेल पुरवठ्याच्या जवळपास २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. सौदी अरेबिया, इराक, कुवेत, संयुक्त अरब अमिराती आणि इराण यांसारखे आखाती देश आपला बहुतांश तेल आणि नैसर्गिक वायू याच अरुंद मार्गाने जगभरात पाठवतात. या रस्सीखेचामुळे तेलाच्या किमतीत मोठी वाढ जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढून प्रति बॅरल $85 च्या जवळ पोहोचले आहेत या मार्गावरील धोके वाढल्याने व्यापारी जहाजांची वाहतूक जवळपास पूर्णपणे ठप्प झाली आहे.

सौदी अरेबिया आणि युएई होर्मुझ सामुद्रधुनीला वळसा घालून तेल निर्यात करण्यासाठी आपापल्या देशांत पर्यायी पाईपलाईन आणि नवीन बंदरांचा विकास करत आहे.

१७,जून २०२६ रोजी अमेरिका आणि इराण यांनी १४ कलमी हंगामी सामंजस्य करार केला या करारनानुसार दोन्ही देशांनी सात दिवसात कायमस्वरूपी करारासाठी वाटाघाटी करणे, व्यापारी जहाजांची वाहतूक पूर्ववत करणे, अमेरिकेने नौदल नाकेबंदी टप्प्याटप्प्याने हटवणे आणि इराणने व्यापारी जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे यावर सहमती दर्शविली होती मात्र, कराराला अवघे २५ दिवस होत असतानाच दोन्ही देशांतील हल्ले पुन्हा सुरू झाले असून कराराच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भारतावरील थेट प्रभाव:भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी जवळपास ४० ते ५० टक्के तेल आणि ९० टक्क्यांपर्यंतचा एलपीजी पुरवठा याच मार्गावरून आखाती देशांतून येतो.भारताला प्रति बॅरल तेलाच्या किमतीत १ डॉलरची जरी वाढ झाली, तरी भारताच्या आयात बिलात अब्जावधी डॉलर्सची भर पडते.इंधनाचे दर वाढल्याने भारतात महागाई वाढते, ज्यामुळे औद्योगिक विकास आणि चालू खात्यातील तूट यावर मोठा ताण येतो.या वाढत्या अनिश्चिततेमुळे जगातील अर्थव्यवस्थांना मोठा फटका बसत आहे. यावर उपाय म्हणून भारत आणि इतर देश स्वतःचे स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह बळकट करत आहेत. त्याचप्रमाणे तेलाच्या आयातीसाठी रशिया आणि इतर देशांचे पर्याय शोधून ऊर्जा सुरक्षेचा समतोल राखण्याचा प्रयत्न सुरू केला. दरम्यान, संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय सागरी संघटना यांनी या वाढत्या संघर्षावर चिंता व्यक्त केली असून दोन्ही देशांना तात्काळ चर्चा सुरू करण्याचे आवाहन केले आहे.

- ९५६१५९४३०६

# ... अखेर इंग्लंड दौऱ्यात भारताने विजयाचे खाते उघडले!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

कर्णधार शुभमन गिलच्या शानदार कर्णधारपदाच्या खेळीमुळे आणि अक्षर पटेलच्या दमदार अष्टपैलू कामगिरीमुळे भारताने पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडचा सहा गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ४७.५ षटकांत २५८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारताने ४५.२ षटकांत चार गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. विशेष म्हणजे, २०१५ नंतर एजबॅस्टन येथील इंग्लंडचा हा पहिला एकदिवसीय पराभव होता. यापूर्वी २०१४ मध्ये त्यांना याच मैदानावर पराभव पत्करावा लागला होता.

### ६१/० ते १०७/६... भारतीय गोलंदाजांनी सामन्याचे चित्र पालटले

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, बेन डकेट आणि फिल सॉल्ट यांच्या मदतीने इंग्लंडने वेगवान सुरुवात केली. १३ व्या षटकाच्या सुरुवातीपर्यंत संघाने एकही गडी न गमावता ६१ धावा केल्या होत्या आणि मोठी धावसंख्या उभारण्याच्या तयारीत दिसत होते.

मात्र, त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी सामन्याचे चित्रच पालटले. जसप्रीत बुमराहने दबाव आणला आणि गुरनूर ब्रार व प्रसिद्ध कृष्णा यांनी झटपट विकेट्स घेत इंग्लंडला बॅकफूटवर ढकलले. यजमान संघाची अवस्था १०७ धावांवर सहा गडी बाद अशी झाली. हॅरी ब्रूक, जोस बटलर आणि जेकब बेथेल यांसारखे फलंदाज मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरले.

### रूट आणि डॉसनने इंग्लंडच्या डगमगत्या डावाला सावरले

१०७ धावांत सहा विकेट्स गमावल्यानंतर, अनुभवी जो रूटने एक बाजू सांभाळून धरली. त्याला लियाम डॉसनची साथ मिळाली, जो बऱ्याच कालावधीनंतर एकदिवसीय संघात परतला होता. या दोन फलंदाजांनी सातव्या विकेटसाठी १२१ धावा जोडून भारताची पकड काही प्रमाणात सैल केली. रूटने सहा चौकार आणि एका षटकारासह ७६ धावांची जबाबदार खेळी केली. तर दुसरीकडे, डॉसनने ८३ चेंडूंमध्ये ६८ धावा करत आपल्या एकदिवसीय कारकिदीर्तील सर्वोत्तम धावसंख्या नोंदवली. त्यांच्या भागीदारीमुळे इंग्लंडला २५८ धावांपर्यंत मजल मारता आली.

### अक्षरने गोलंदाजीनेही आपले कौशल्य दाखवले

अक्षर पटेल भारतासाठी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. सुरुवातीच्या षटकांमध्ये एकही बळी न घेताही, त्याने शेवटच्या फलंदाजांना झटपट बाद केले आणि १० षटकांत ६२ धावांत चार बळी अशी कामगिरी केली. जसप्रीत बुमराहने त्याच्या आकडेवारीपेक्षा खूपच चांगली गोलंदाजी केली. त्याने नऊ षटकांत केवळ ३१ धावा देऊन एक बळी घेतला आणि आपल्या संपूर्ण स्पेलमध्ये इंग्लिश फलंदाजांना मोकळेपणाने खेळू दिले नाही. गुरनूर ब्रार आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

### रोहित आणि कोहली स्वस्तात बाद, गिलने सूत्रे हाती घेतली

२५९ धावांचे लक्ष्य गाठताना भारताची सुरुवात खराब झाली. रोहित शर्मा ११ धावांवर आणि विराट कोहली केवळ पाच धावांवर बाद झाला. ४८ धावांत दोन मोठ्या विकेट गमावल्यानंतर इंग्लंड सामन्यावर वर्चस्व गाजवत असल्याचे दिसत होते. त्याच क्षणी, कर्णधार शुभमन गिलने पुन्हा एकदा सूत्रे हाती घेतली. त्याने सुरुवातीला संयम दाखवला आणि नंतर जेव्हा जेव्हा संधी मिळाली तेव्हा आपल्या आवडत्या ड्राईव्ह आणि पुल शॉट्सने धावा केल्या. श्रेयस अय्यरसोबत तिसऱ्या विकेटसाठी १०१ धावांची भागीदारी करून गिलने भारताला मजबूत स्थितीत आणले.

### शतकापूर्वी दुखापतग्रस्त झालेला गिल, दुखापतग्रस्त होऊन निवृत्त झाला

गिल उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता आणि त्याचे शतक जवळपास निश्चित वाटत होते. त्याने ७५ चेंडूंमध्ये ११ चौकार आणि एका षटकारासह ८० धावा केल्या होत्या. तथापि, डावादरम्यान, पोटऱ्यांमध्ये पेटके आणि नंतर हॅमस्ट्रिंगच्या त्रासामुळे त्याला मैदान सोडावे लागले. गिल ८० धावांवर दुखापतग्रस्त होऊन निवृत्त झाला. एजबॅस्टन येथील त्याचा प्रभावी विक्रम या सामन्यातही कायम राहिला. गेल्या वर्षी, त्याने याच मैदानावर कसोटी सामन्यांमध्ये २६९ आणि १६१ धावा केल्या होत्या.

### श्रेयस आणि राहुल बाद झाल्याने उत्कंठा शिगेला पोहोचली

गिल मैदानाबाहेर गेल्यानंतर भारतावरील दबाव काही काळासाठी वाढला. चांगली फलंदाजी करणारा श्रेयस अय्यर ३५ धावा करून धावबाद झाला. त्यानंतर केएल राहुल जोश टंगच्या वेगवान चेंडूवर त्रिफळाचीत झाला. भारताची धावसंख्या चार गडी बाद १६० वर पोहोचली आणि इंग्लंडला सामन्यात पुनरागमन करण्याची आशा दिसू लागली.

### अक्षर आणि वॉशिंग्टनने इंग्लंडचे स्वप्न भंग केले

टि -२० मालिकेत फलंदाजीसाठी झगडणाऱ्या अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी एकदिवसीय सामन्यात उल्लेखनीय संयम दाखवला. या दोघांनी आधी विकेट वाचवल्या आणि नंतर खराब चेंडूंवर धावा केल्या. त्यांनी जोफ्रा आर्चरच्या वेगवान गोलंदाजीचाही हुशारीने सामना केला आणि फिरकी गोलंदाजांविरुद्ध मुक्तपणे धावा केल्या. या दोन फलंदाजांनी पाचव्या विकेटसाठी नाबाद १०२ धावांची भागीदारी करून भारताला सहज विजय मिळवून दिला. अक्षरने ५२ चेंडूंमध्ये नाबाद ५७ धावा केल्या, तर वॉशिंग्टन सुंदरने ६३ चेंडूंमध्ये नाबाद ५२ धावा केल्या. वॉशिंग्टनने विजयी षटकार मारून भारताला विजय मिळवून दिला आणि आपले अर्धशतकही पूर्ण केले.

### हा विजय विशेष का आहे?

भारताने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. सध्याच्या इंग्लंड दौऱ्यावरील भारताचा हा पहिला विजय होता. २०१५ नंतर एडजबॅस्टन येथील इंग्लंडचा हा पहिला एकदिवसीय पराभव आहे. यापूर्वी भारताने २०१४ मध्ये इंग्लंडला पराभूत केले होते. इंग्लंडविरुद्ध भारताचा हा सलग सहावा एकदिवसीय विजय आहे. या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध भारताची ही सर्वात मोठी सलग विजयांची मालिका आहे. शुभमन गिलने एजबॅस्टन येथे पुन्हा एकदा शानदार कामगिरी करत या मैदानावर आपला उत्कृष्ट विक्रम कायम ठेवला. अक्षर पटेलने चार बळी घेत आणि नाबाद अर्धशतक झळकावत सामन्यातील सर्वात मोठ्या नायकाची भूमिका बजावली.

- ९०९६३७२०८२

# शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांच्या उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष चिंताजनक!

रमेश लांजेवार
नागपूर

ज्या क्षेत्रातून देश तयार होतो आणि युवा पिढीचे भविष्य निर्माण होते व लहानाचा मोठा होतो. अशा क्षेत्रात जर पेपर लिक होत असेल आणि त्याचे उत्तरदायित्व सरकार स्विकारण्यास तयार नसेल तर ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही.कारण पेपर फुटी हा विद्यार्थ्यांच्या भविष्यावर मोठा धब्बा असुन, घणाघाती प्रहार आहे.कारण नीट पेपर लिक प्रकरणात २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या ही देशाला आणि शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना आहे.

एवढी मोठी घटना होऊनही याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.याला वाचा फोडण्यासाठी वांगचूक समोर आले आहे.परंतु सरकार त्यांच्याकडे गांभीर्याने लक्ष देण्यास तयार नाही.देशात एवढे मोठे नीट पेपर लिक प्रकरण झाले. परंतू याची जबाबदारी सरकार तिळमात्र स्विकारण्यास तयार नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. सीजेपीने सुरू केलेल्या आंदोलनाचा २५ वा, तर वांगचुक यांच्या उपोषणाचा १७ वा दिवस १४ जूलैला पूर्ण झाला.अशा परिस्थितीत सरकारने या आंदोलनाकडे दुर्लक्ष न करता, लोकशाहीच्या हिताचा मान ठेवून सीजेपी सोबत चर्चा करणे आवश्यक आहे.

सीजेपीच्या मागण्या काय आहे तो नंतरचा प्रश्न.परंतु जनहितार्थ व विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून आणि देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा सन्मान व्हावा या दृष्टीने देशापुढे सत्य आणण्यासाठी सरकारची वांगचुक यांच्या उपोषणाच्या बाबतीत चर्चा करणे अत्यंत गरजेचे आहे. सीजेपीच्या प्रमुख मागण्यामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा व परीक्षा गैरव्यवहारांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रूपयांची भरपाई द्यावी व अन्य मागण्या सीजेपीच्या आहेत.

या मागण्याच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करून तातडीने आंदोलकांशी संवाद साधून चर्चा केली पाहिजे.कारण नीट पेपर असो अथवा टीईटी पेपर फुटी असो यामुळे शिक्षण क्षेत्राची मोठ्या




प्रमाणात बदनामी व नाचक्की झाली आहे आणि होत आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी लढा देण्याची शपथ घेतली आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी देशाची राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषण सुरू केले.परंतु सरकार त्यांच्या उपोषणाबद्दल कोणत्याही प्रकारची दखल घेत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. परंतु सरकारची मुजोरी आणि शिक्षणाबद्दलची अवहेलना पहाता सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण तात्पुरते मागे घेऊन व सर्वांना संघटित करून वेगळ्या मार्गाने लढा दिला पाहिजे. कारण "जान है तो जहान है"हा मुलमंत्र अंगिकारून पुढील पाऊल उचलावे.

आज देशाला सोनम वांगचुक सारख्या शिक्षणतज्ज्ञाची मोठी गरज आहे.त्यामुळे उपोषण मागे घेऊन वेगळ्या पद्धतीने लढा उभा करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. आतापर्यंत जीतकेही पेपर फुटले ते सर्व भ्रष्टाचाराच्या माध्यमातूनच फुटले आहेत. याकरीता सरकार जोपर्यंत भ्रष्टाचार संपविण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करत नाही, तोपर्यंत सर्वच बाबतीत मनमानी, अनियंत्रितपणा आणि चुकीच्या निर्णयाचे हे चक्र सुरूच राहील.हा केवळ शिक्षण व्यवस्थेवरच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजावर एक कलंक आहे.

जेव्हा परीक्षेचे पेपर फुटतात तेव्हा तुम्हाला डॉक्टर आणि इंजिनिअर कसे मिळणार? हेच डॉक्टर जे पेपर फुटीतून कॉपी करून पास झाले आहेत,ते देशातील जनतेचा उपचार करतील आणि इंजिनिअर तुमच्या इमारती बांधतील, ज्यामुळे इमारती धाराशाही होऊन जीवितहानी होईल आणि डॉक्टरच्या चुकीच्या निर्णयामुळे जिवीत हाणी सुद्धा होऊ शकते यालाही नाकारता येत नाही.

हा सर्व प्रकार पेपर फुटीतून उत्पन्न होतो. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचे महत्व समजून आणि त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून सरकारने तातडीने पाऊल उचलले पाहिजे.कारण आंदोलकांचे योग्य समाधान व्हावे हीच आमची इच्छा.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# पाऊस गायब... उकाडा बेशिस्त !

## पुर्नवसुने दिला दगा; पुन्हा पेटला उन्हाचा कहर, बळीराजाच्या चिंतेत भर

## बंद झालेले कूलर पुन्हा सुरू; पिके कोमेजू लागल्याने शेतकऱ्यांची वाढली धास्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

आर्द्रा नक्षत्रात झालेल्या समाधानकारक पावसामुळे नरखेड तालुक्यासह परिसरात वातावरणात गारवा निर्माण झाला होता. उन्हाचा तडाखा कमी झाल्याने घराघरातील कूलर, पंखे आणि वातानुकूलित यंत्रे (एसी) बंद झाली होती. मात्र, पुनर्वसु नक्षत्र सुरू होताच पावसाने अचानक दडी मारल्याने पुन्हा एकदा उन्हाचा कहर वाढला असून नागरिकांना उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



गेल्या आठवडाभरापासून तालुक्यात पावसाने विश्रांती घेतल्याने तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे.

सकाळपासूनच कडक ऊन पडत असून दुपारच्या वेळी उष्णतेचा चटका आणि दमट वातावरणामुळे उकाडा असह्य होत आहे. त्यामुळे काही दिवसांपूर्वी बंद करून ठेवलेले कूलर पुन्हा सुरू करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. विजेचा वापर वाढल्याने जुलै महिन्यातील वीज बिलही भरमसाठ येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पावसाच्या खंडामुळे खरीप हंगाम संकटात सापडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांना या टप्प्यावर सतत ओलाव्याची गरज असताना पाऊस गायब झाल्याने अनेक शेतांमध्ये अंकुर कोमेजू लागले आहेत. दुबार पेरणी केलेल्या शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली असून आणखी दोन-तीन दिवस पाऊस न झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे दुपारच्या वेळेत बाजारपेठांमध्येही शुकशुकाट दिसून येत आहे. थंड पेये, ताक, सरबत आणि ऊसाच्या रसाला मागणी वाढली असून नागरिक शक्यतो घराबाहेर पडणे टाळत आहेत. ग्रामीण भागातही उन्हाळ्यासारखीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

हवामानातील या अनपेक्षित बदलामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांच्या नजरा आता आकाशाकडे लागल्या आहेत. पुनर्वसु नक्षत्रात दमदार पाऊस झाल्यासच खरीप हंगामाला दिलासा मिळणार असून अन्यथा शेतीपुढील संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### पुन्हा सुरू करावे लागले कूलर

आर्द्रा नक्षत्रातील पावसानंतर अनेकांनी उन्हाळ्यात वापरलेले कूलर बंद करून ठेवले होते. मात्र अवघ्या दहा-बारा दिवसांतच वाढलेल्या उकाड्यामुळे पुन्हा कूलर सुरू करावे लागत आहेत. त्यामुळे विजेचा वापर वाढून घरगुती वीज बिलाचा भारही वाढणार आहे.

### कोमेजणारी पिके पाहून बळीराजा हताश

वेळेवर पाऊस न झाल्याने मातीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. ज्या काळात पिकांची जोमाने वाढ व्हायला हवी, त्याच काळात उष्णतेच्या झळा बसत असल्याने शेतातील अंकुर कोमेजू लागले आहेत. उगवलेले पीक डोळ्यासमोर सुकताना पाहून शेतकरी हतबल झाला असून, आता त्याच्या नजरा केवळ आकाशाकडे खिळल्या आहेत.

# नागपुरात १८ जुलै रोजी निघणार भव्य 'वारकरी दिंडी'

### ५० शाळांतील ३००० हून अधिक विद्यार्थ्यांचा राहणार सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आषाढी एकादशीनिमित्त वारक-यांची दिंडी पंढरपूरकडे रवाना झालेली असताना नागपुरातही छोट्या वारक-यांच्या दिंडीने शनिवार, १८ जुलै रोजी विठ्ठल भक्तीचा सोहळा रंगणार आहे.

नूतन भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अभ्यंकर नगर नागपूर, नागपूर महानगरपालिका नागपूर,शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद नागपूर, मराठी भाषा ज्ञानसंवर्धन प्रतिष्ठान नागपूर, सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट नागपूर, यांच्या संयुक्त विद्यमाने वारकरी परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा व अस्मिता यांची ओळख व्हावी या उद्देशाने ही वारकरी दिंडी आयोजित करण्यात आली आहे.

शनिवारी सकाळी ८ वाजता सावरकर पुतळा, शंकर नगर येथून दिंडीला नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नीता ठाकरे राहणार असून आ. ॲड. अभिजीत वंजारी व संजय भेंडे, माजी आ. संदीप जोशी, स्थायी समिति अध्यक्ष शिवानी दाणी वखरे, मनपा आयुक्त विपीन इटणकर, पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, जिल्हा परिषद सीईओ विनायक महामुनी, उपसंचालक माधुरी सावरकर, शिक्षणाधिकारी माध्यमिक अनिल दहिफळे अध्यक्ष मराठी भाषा ज्ञान संवर्धन प्रतिष्ठान रवींद्र काटोलकर व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सुमारे ५० शाळांमधील ३००० हजाराहून अधिक विद्यार्थी पारंपरिक वारकरी वेशभूषेत सहभागी होतील. प्रारंभी विठ्ठल-रखुमाईचे पूजन



करण्यात येईल व त्यानंतर पारंपरिक टाळ-मृदुंगाच्या गजरात दिंडी मार्गस्थ होईल. ज्ञानेश्वर मंदिर, बजाज नगर येथे आरतीने दिंडीचा समारोप करण्यात येणार आहे.

यानंतर सकाळी १०.३० वाजल्यापासून नूतन भारत विद्यालयाच्या प्रांगणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या वारकरी दिंडीत सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्राच्या वैभवशाली वारकरी परंपरेचा अनुभव घ्यावा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नूतन भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे सचिव रमेश बक्षी, शाळेच्या मुख्याध्यापक डॉ. वंदना बडवाईक यांनी केले आहे.

## मोखेबर्डी उपसा सिंचन योजनेतून भिवापूरच्या शेतकऱ्यांसाठी कालव्यात पाणी

### सुधीर पारवे यांच्या पाठपुराव्याला यश; आंभोरा योजनेतूनही सिंचनास हिरवा कंदील

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर :** पावसाअभावी दुबार-तिबार पेरणीचे संकट ओढवल्याने अडचणीत सापडलेल्या उमरेड विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



माजी आमदार सुधीर पारवे यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत मोखेबर्डी उपसा सिंचन योजनेतून भिवापूर तालुक्यासाठी तसेच आंभोरा उपसा सिंचन योजनेतून उमरेड व कुही तालुक्यातील शेतीसाठी कालव्याद्वारे सिंचनाचे पाणी सोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

यासंदर्भात सुधीर पारवे यांनी नागपूर जिल्हाधिकारी तसेच जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला बियाण्यांचा तुटवडा, बोगस बियाण्यांचा फटका आणि त्यानंतर झालेल्या अपुऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांना दुबार व तिबार पेरणी करावी लागली. कपाशी, सोयाबीन, तूर आणि धानाची पिके ओलाव्याअभावी करपण्याच्या स्थितीत असून सिंचनासाठी तातडीने पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली होती.

या मागणीची दखल घेत जिल्हाधिकारी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता, कार्यकारी संचालक, अधीक्षक अभियंता व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली. त्यानंतर कनिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने सिंचनासाठी पाणी सोडण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार गुरुवारपासून मोखेबर्डी उपसा सिंचन योजनेतून भिवापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी कालव्याद्वारे पाणी सोडण्यास सुरुवात झाली असून आंभोरा योजनेतूनही सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळणार असल्याने उमरेड, भिवापूर आणि कुही तालुक्यातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या पाठपुराव्यासाठी माजी आमदार सुधीर पारवे यांचे शेतकरी व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आभार मानले.

# खापा (घु.) आत्महत्या प्रकरणाला नवे वळण!

## पीडित कुटुंबाच्या मदतीला धावले माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते दिनेश टुले, न्यायासाठी मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांची भेट घेणार

### २५ हजारांची आर्थिक मदत; उच्च न्यायालयापर्यंत लढा देण्याची ग्वाही

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

जलालखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खापा (घु.) येथील युवा शेतकरी भगवान किसणा मानमोडे यांच्या आत्महत्या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, भिष्णुरचे माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते दिनेश टुले यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी संपूर्ण घटनेची सविस्तर माहिती जाणून घेत कुटुंबीयांना धीर देत न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने शेवटपर्यंत लढा देण्याची ग्वाही दिली.

भेटीदरम्यान भगवान किसणा मानमोडे यांचे वडील किसनाजी मानमोडे यांनी आपल्या मुलावर झालेल्या कथित अन्यायाची व्यथा मांडली. "भगवान यांना खोट्या गुन्ह्यात अडकवून बेदम मारहाण करण्यात आली. आमचा ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. पोलिसांच्या सततच्या त्रासामुळे आमच्या मुलाने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. आमच्या कुटुंबाचा आधारच हिरावला गेला असून आम्हाला न्याय मिळालाच पाहिजे," अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

यावेळी दिनेश टुले यांनी मृतकाचे वडील किसनाजी मानमोडे यांना २५ हजार रुपयांचा आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द केला. ही मदत समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, हे प्रकरण केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नसून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

दि. १३ जुलै २०२६ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशनवर शेकडो ग्रामस्थांनी एकत्र येत संताप व्यक्त केला होता. संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. प्रशासनाने योग्य चौकशीचे आश्वासन दिल्यानंतरच भगवान किसणा मानमोडे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते. मात्र, अद्यापही संबंधितांवर ठोस कारवाई न झाल्याने कुटुंबीय व ग्रामस्थांमध्ये संताप कायम आहे.



यावेळी दिनेश टुले यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "भगवान किसणा मानमोडे यांच्या मृत्यूमागील सत्य बाहेर आलेच पाहिजे. दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. गरज भासल्यास हे प्रकरण उच्च न्यायालयात नेऊन कायदेशीर लढा दिला जाईल. मानमोडे कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू."

याशिवाय, भिष्णुरचे माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते दिनेश टुले लवकरच मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन भगवान किसणा मानमोडे प्रकरणाची सविस्तर माहिती देणार असून, संबंधित दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. या प्रकरणात निष्पक्ष चौकशी करून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने विशेष लक्ष घालावे, अशी मागणीही ते करणार आहेत.

या भेटीप्रसंगी वामणराव काळमेंघ, वसंतराव चाफले, दिनेश चाफले, हेमंत राऊत, हरी गजभिये, विक्की बन्नागरे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनीही या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच, पीडित कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत, कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी आणि स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते दिनेश टुले यांनी दिलेल्या आर्थिक मदतीसह मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांकडे न्यायासाठी धाव घेण्याच्या निर्णयामुळे मानमोडे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून, या प्रकरणात न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात १६ जुलै रोजी काटोलमध्ये महाएल्गार मोर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता काटोल येथे भव्य महाएल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती काटोलझनरखेड विधानसभा महाएल्गार मोर्चा समितीच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

समितीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण हा समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाच्या उद्देशाने मिळवून दिलेल्या आरक्षणाच्या मूळ संकल्पनेला धक्का देणारा निर्णय असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पत्रकात नमूद करण्यात आले आहे की, आरक्षण हे दलित, आदिवासी व इतर वंचित घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीचे प्रभावी साधन असून त्याचे विभाजन केल्यास समाजात जातीय तेढ निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे हा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

हा महाएल्गार मोर्चा परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, काटोल येथून सुरू होणार असून, संविधान, सामाजिक न्याय आणि आरक्षणाच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीने केले आहे.

काटोल-नरखेड विधानसभा महाएल्गार मोर्चा समितीने आंबेडकरी अनुयायी, बहुजन समाज, संविधानप्रेमी नागरिक तसेच आरक्षण समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन मोर्चाचे आयोजक दिगांबर डोंगरे, षंद बनसोड, विजय दहाट, नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे, उत्तमराव दुपारे,

### काटोल-नरखेड विधानसभा महाएल्गार मोर्चा समितीची माहिती

कृष्णा गवईकर, एकनाथ पाटील, सुनिल नारनवरे, धीरज ढोके, सुजाता डबरासे, सुनंदा जाधव, मिना पाटील, ललिता दुपारे, रिना बनसोड, शोभा सोनुले, रंजना ढोके, ज्योत्स्ना तायवाडे, दिपाली गौरखेडे, शोभा सोनुले, सुनिल मुन, सुनिल गजभिये, श्रीधर सोमकुवर, संभाजी सोनुले, सुनील फाटे यांनी केले आहे.

थोडक्यात

## विहिरीत पडलेल्या सात फुटी अजगराला वनविभागाचे जीवदान

### नांदणी शिवारातील घटना, वनविभाग व रेस्क्यू पथकाच्या तत्परतेमुळे यशस्वी सुटका



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील नांदणी शिवारातील शेतकरी बंडू गायकवाड यांच्या शेतातील विहिरीत पडलेल्या सुमारे सात फुटी अजगराची वनविभाग व सर्पमित्रांच्या संयुक्त प्रयत्नातून सुरक्षित सुटका करण्यात आली. यानंतर अजगराला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितरीत्या सोडण्यात आल्याने वन्यजीवप्रेमींनी समाधान व्यक्त केले. मिळालेल्या माहितीनुसार, शेतातील विहिरीत मोठा अजगर पडल्याचे निदर्शनास येताच शेतकऱ्यांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच वनविभागाचे क्षेत्र सहाय्यक येलमे, नियत क्षेत्र अधिकारी बेलकर, काकड तसेच महेंद्री येथील नागरिक हेमंत काळे आणि नांदणी येथील नागरिक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने अजगराला कोणतीही इजा न होता अत्यंत सावधगिरीने विहिरीतून बाहेर काढले. त्यानंतर मोवाड रेस्क्यू टीमचे आकाश कवडती व त्यांच्या सहकाऱ्यांनी अजगराला सुरक्षितरीत्या वनक्षेत्रात नेऊन नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. संपूर्ण रेस्क्यूदरम्यान आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या असून, नागरिकांनीही संयम राखत वनविभागाला सहकार्य केले.

वनविभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अजगर किंवा इतर वन्यप्राणी आढळल्यास त्यांना इजा करण्याचा अथवा पकडण्याचा प्रयत्न करू नये. त्वरित वनविभाग किंवा अधिकृत सर्पमित्रांना माहिती द्यावी. अशा तत्परतेमुळे वन्यजीवांचे संरक्षण होण्यास मदत होते तसेच मानव-वन्यजीव संघर्ष टाळता येतो. या यशस्वी रेस्क्यू मोहिमेमुळे एका दुर्मिळ वन्यजीवाला जीवदान मिळाले असून, वनविभागाच्या तत्पर कार्याचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

## सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालयात उत्साहात प्रवेशोत्सव साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दहाट यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्युनिअर महाविद्यालयाचे उपप्राचार्य व्ही. बी. वंजारी हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये पर्यवेक्षक एन. डी. मेंढे यांची उपस्थिती लाभली.

यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. नवीन विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थिती, शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेचे जतन करण्याचे आवाहन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन एस. वासनिक तसेच आशीष क्षिरसागर यांनी केले, तर कार्यक्रमाचे संयोजन एल. डी. मासुरकर यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## अल्पवयीन दुचाकी चालकांविरुद्ध वाहतूक शाखेची धडक कारवाई : ६५ वाहने जप्त, पालकांचे समुपदेशन



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

चंद्रपूर शहरातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी आणि वाहतुकीला शिस्त लावण्याच्या उद्देशाने चंद्रपूर शहर वाहतूक शाखेने अल्पवयीन दुचाकी चालकांविरुद्ध विशेष धडक मोहीम राबविली. या कारवाईत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६५ अल्पवयीन चालकांकडील दुचाकी वाहने जप्त करण्यात आली. कारवाईनंतर सर्व अल्पवयीन चालकांच्या पालकांना वाहतूक शाखेत बोलावून त्यांचे समुपदेशन करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी पालकांना अल्पवयीन मुलांच्या हातात वाहने देण्याचे गंभीर परिणाम समजावून सांगितले. १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी आणि वैध वाहनचालक परवाना नसताना मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, असे आवाहनही करण्यात आले.

समुपदेशनानंतर प्राथमिक स्वरूपात जप्त करण्यात आलेली वाहने पालकांच्या ताब्यात देण्यात आली. मात्र, ही कारवाई केवळ जनजागृतीपुरती असून भविष्यात अल्पवयीन वाहन चालविताना आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार संबंधित चालक, वाहनमालक आणि पालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा वाहतूक शाखेने दिला आहे. शहर सुरक्षित आणि अपघातमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे तसेच अल्पवयीन मुलांच्या हातात वाहन देणे टाळावे, असे आवाहन चंद्रपूर वाहतूक शाखेने केले आहे.

थोडक्यात

## परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त जलालखेडा बस स्थानकात वृक्षारोपण

### पर्यावरण संवर्धनाचा संदेश, वृक्षसंवर्धनाची घेतली सामूहिक शपथ




**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवार, दि. १४ जुलै रोजी जलालखेडा बस स्थानक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून राज्यभर राबविण्यात आलेल्या विशेष वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत जलालखेडा बस स्थानकात विविध प्रकारच्या सावली, फळझाडे व शोभेच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संरक्षण, हरित महाराष्ट्र आणि स्वच्छ परिसर या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वृक्षारोपणासोबतच लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारत उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथही घेतली.

यावेळी उपस्थितांनी वृक्षांचे वाढते महत्त्व अधोरेखित करत हवामान बदल, वाढते प्रदूषण आणि तापमानवाढ रोखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. बस स्थानक परिसर अधिक हिरवागार, स्वच्छ व प्रवाशांसाठी आल्हाददायक करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही सांगण्यात आले. राज्यभरातील सुमारे एक हजार बस स्थानके व विभागीय कार्यालयांमध्ये एकाच दिवशी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या अभियानामुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती होऊन अधिकाधिक वृक्ष लागवड व संवर्धनासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास ग्रामपंचायत प्रशासक मयूर सोनोने, ग्रामविकास अधिकारी मुकुंद भोयर, वाहतूक नियंत्रक नरेंद्र राऊत, साजिद पठाण, शिवसेना (शिंदे गट) तालुका उपाध्यक्ष योगेश मानकर, सफाई कामगार खुशाल मानेकर तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २३ .७४ लाखांच्या घरफोडीचा बल्लारपूर पोलिसांकडून पर्दाफाश : सात आरोपी जेरबंद



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

बल्लारपूर पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करत २३.७४ लाखांच्या घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत सात आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेल्या मालापैकी सुमारे २१ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे. प्राप्त माहितीनुसार, २७ जून २०२६ रोजी शिवाजी वॉर्ड, बल्लारपूर येथील रहिवासी राजवीरसिंह धनसिंह सनवाल (वय ६०) यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तू असा २३ लाख ७४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या प्रकरणी बल्लारपूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७११/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(४) व ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि गुप्त माहितीच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करून आरोपी रोहित कनाई मंडल (वय २३), रा. अष्टभुजा वॉर्ड, चंद्रपूर याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदार शुभम जयसिंग उईके (वय २३) याच्यासह घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यानंतर शुभम उईके यालाही मध्यरात्री चंद्रपूर येथून ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्यानेही गुन्ह्याची कबुली दिली. चौकशीत आरोपींनी चोरीचा काही माल विविध व्यक्तींना विकल्याचे उघड झाल्यानंतर पोलिसांनी अब्दुल हमीद कादिर शेख, गन्नी उर्फ जनार्धन रमेश सोनी, संजू चंदेश्वर सोनी, राजेश महेश सोनी आणि हनमंत जगन्नाथ बाबर या पाच जणांना ताब्यात घेतले. या संपूर्ण कारवाईत पोलिसांनी सुमारे २१ लाख रुपयांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला असून उर्वरित मालाचा शोध सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे यांच्या नेतृत्वात पोउपनि उमेश जोगदंड, पोहवा संतोष पंडीत, लालू यादव, पुरुषोत्तम चिकाटे, विकास जुमनाके, सत्यवान कोटनाके, पंकज शिंदे, भास्कर चिंचवलकर, नपोअं सचिन आलेवार, पोअं महेश कुकुडकर, लखन चव्हाण, वैभव गाडगे, शरदचंद्र कारूष, मिलिंद आत्राम, मपोअं अनिता नायडू यांनी केले.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम १९ जुलैला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी महाल येथील गडकरी



वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

# नागपूर जिल्हा क्रीडा संकुलासाठी १०० कोटींच्या प्रकल्पास शासनाची मंजुरी

### आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध होणार

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्याला यश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी १०० कोटींच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, या प्रकल्पामुळे नागपूरमध्ये राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध होणार आहेत

नागपूरच्या क्रीडा विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

नागपूर जिल्हा क्रीडा संकुल हे आधुनिक तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय निकषांनुसार विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये ३०० मुलांसाठी व ३०० मुलींसाठी स्वतंत्र सुसज्ज वसतिगृहे, बहुउद्देशीय इनडोअर हॉल, २० मीटर व ५० मीटर शूटिंग रेंज, ४०० मीटर सिंथेटिक ॲथलेटिक्स ट्रॅक, हॉकीसाठी ॲस्ट्रोटर्फ मैदान, सिंथेटिक बास्केटबॉल कोर्ट, ७० मीटर आर्चरी रेंज, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल मैदाने, मिनी गोल्फ सुविधा, आधुनिक व्यायामशाळा, सौर ऊर्जा प्रकल्प, चेंजिंग रूम, पाणीपुरवठा व्यवस्था आणि इतर अत्याधुनिक सुविधा उभारण्यात



येणार आहेत.

या प्रकल्पाला २० मे २०२६ रोजी उच्चस्तरीय सचिव समितीची मंजुरी मिळाल्यानंतर २५ जून २०२६ रोजी राज्य मंत्रिमंडळानेही मंजुरी दिली होती. त्यानंतर आता शासनाने प्रशासकीय मान्यता दिल्याने प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठी लागणारा संपूर्ण निधी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

> नागपूरमध्ये आधुनिक क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्याचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होत आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील होतकरू खेळाडूंना त्यांच्या गुणवत्तेनुसार प्रशिक्षण, निवासी सुविधा आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक वातावरण मिळेल. या प्रकल्पामुळे नागपूरमध्ये राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे अधिक सुलभ होणार असून, विदर्भातील हजारो खेळाडूंना त्याचा थेट लाभ मिळणार आहे.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री**

शासनाने प्रकल्पातील विशेष तांत्रिक कामांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी मुख्य कंत्राटदाराने अनुभवी क्रीडा क्षेत्रातील कंत्राटदारासोबत संयुक्त उपक्रम (जॉइंट व्हेंचर) करूनच निविदा सादर करणे आवश्यक केले आहे. त्यामुळे प्रकल्प आंतरराष्ट्रीय दर्जानुसार उभारला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नागपूरच्या क्रीडा विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मंजूर झाल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले. नागपूरची ओळख आधुनिक क्रीडा सुविधांनी सज्ज असलेल्या देशातील प्रमुख क्रीडा केंद्रांपैकी एक म्हणून अधिक मजबूत होण्यास या प्रकल्पाची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे. विदभार्तील खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय ऐतिहासिक असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या मंजुरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.

## हरगोविंद वनवासी छात्रावास, धारणीला यंदाचा 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार-२०२६' जाहीर

### धरमपेठ शिक्षण संस्थेतर्फे करण्यात आली घोषणा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना प्रदान करण्यात येणारा 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार-२०२६' यंदा अमरावती जिल्ह्यातील हरगोविंद वनवासी छायावास, धारणी यांना जाहीर करण्यात आला असल्याची घोषणा धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर यांनी केली आहे. एक लाख रुपये, सन्मानचिन्ह व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहील. हरगोविंद वनवासी छात्रावासाद्वारे १९९०-९१ सालापासून मेळघाटातील दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येते. छात्रावासातून आजवर हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची निवास व शिक्षणाची सोय येथे करण्यात येते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निवासी व्यवस्था, पौष्टिक आहार, शैक्षणिक मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा तयारी, संगणक शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम तसेच व्यक्तिमत्त्व विकासावर विशेष भर दिला जातो. मेळघाटातील आदिवासी समाजात शिक्षणाची गोडी निर्माण करून अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य या संस्थेने केले आहे. धरमपेठ शिक्षण संस्थेतर्फे स्थापना दिनानिमित्त दरवर्षी ३ ऑगस्ट रोजी 'सामाजिक जाणीव दिवस' साजरा केला जातो. त्यानिमित्ताने 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार-२०२६' वितरण सोहळ्याचे धरमपेठ म. पां. देव स्मृती विज्ञान महाविद्यालयात आयोजन करण्यात येणार असून सेवाभारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री विजयराव पुराणिक यांच्या हस्ते पुरस्कार वितरण केले जाईल, असे संस्थेचे सचिव सुरेश देव व पुरस्कार समिती प्रमुख डॉ. कुमार शास्त्री यांनी सांगितले.

## समाजभूषण पुरस्कारप्राप्त विस्तार अधिकारी रंगेहात पकडला

**दै. सिंहवाणी वृत्त, बुलढाणा :** राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाईचा धडाका पाहायला मिळत आहे. गेल्या काही महिन्यात विभागाने जोरदार कारवाई करत अनेक सरकारी अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत. विशेष म्हणजे, शिपायापासून ते उपजिल्हाधिकारी पदापर्यंतच्या अधिकाऱ्यांनाही लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली आहे. आता, बुलढाणा जिल्ह्यात पुन्हा एकदा एसीबीने कारवाई करत विस्तार अधिकाऱ्यास लाच घेताना रंगेहात अटक केली. जळगाव जामोद पंचायत संमतीतील विस्तार गट विकास अधिकारी संदीप मोरे यास २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली आहे.

अमरावती लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने बुलढाण्यातील जळगाव जामोदमध्ये मोठी कारवाई केली असून जळगाव जामोद तालुक्यातील शेतकऱ्याकडून शासकीय काम करून देण्यासाठी संदीप मोरे याने तब्बल २५ हजाराची लाच मागितली होती. विशेष म्हणजे लाचखोर संदीप मोरे हा बुलढाण्यात अनेक समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेला अधिकारी आहे. मात्र, समाजापुढे समाजभूषणचा चेहरा दाखवणाऱ्या सचिन मोरेचा बुरखा फाटला असून त्याचा खरा चेहरा समाजासमोर आला आहे. या कारवाईनंतर जिल्ह्यातील प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## वलियों के आस्ताने अल्लाह की निशानियां

### ताजबाग के सालाना उर्स में मौलाना अमीनुल कादरी की तकरीर में उमड़ी भीड़

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के १०४वें सालाना उर्स के अवसर पर ताजबाग में प्रख्यात मुस्लिम धर्मगुरु मौलाना सैयद अमीनुल कादरी की तकरीर का कार्यक्रम आयोजित हुआ. कार्यक्रम में प्रमुख रूप से हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के चेयरमैन प्यारे जिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, ट्रस्टी हाजी फारूकभाई बावला, हाजी इमरान खान ताजी, मुस्तफाभाई टोपीवाला, गजेंद्रपाल सिंह लोहिया उपस्थित थे.

इस दौरान इस्लामी विद्वान धर्मगुरु मौलाना सैय्यद अमीनुल कादरी ने हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के १०४वें सालाना उर्स के अवसर पर आयोजित तकरीर कार्यक्रम में उपस्थितों को संबोधित करते हुए अपने संबोधन में पैगंबर साहब (सल्लल्लाहु अलैहि व



सल्लम) के अंतिम संदेशवाहक होने के सिद्धांत साहित्य औलियाओं की महिमा और उनके चमत्कारों पर विस्तार से प्रकाश डाला. उन्होंने कहा कि जो लोग वलियों के चमत्कारों को महज कहानियां बताकर उन्हें नकारते हैं, वे पिछले दरवाजे से धर्म पर पाबंदी लगाने की नाकाम कोशिश कर रहे है.

मौलाना अमीनुल कादरी ने संबोधित करते हुए कहा कि ईश्वर ने धर्म को पूर्ण कर दिया है और अंतिम पैगंबर का ताज हजरत मोहम्मद साहब (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) के सिर पर सजा दिया. अब कयामत तक कोई नया पैगंबर दुनिया में नहीं आएगा. उन्होंने जोर देकर कहा, इस बात पर विश्वास रखना उतना ही जरूरी है जितना अल्लाह को एक मानना और कयामत के दिन पर यकीन रखना. उन्होंने कहा कि पैगंबर साहब (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) के दुनिया से जाने के बाद समाज को सही रास्ता दिखाने की जिम्मेदारी विद्वानों (उलेमा) और संतों (औलिया) पर है. विद्वान जहाँ तर्कों और किताबों के जरिए लोगों को समझाते हैं, वहीं संत अपनी आध्यात्मिक शक्तियों और चमत्कारों के जरिए उन कठोर दिलों को धर्म की तरफ लाते हैं जो सिर्फ किताबी तर्कों से संतुष्ट नहीं होते. उन्होंने कहा की बाबा ताजुद्दीन जन्मजात संत हैं. हजरत बाबा ताजुद्दीन की महानता बताते हुए मौलाना ने कहा कि बाबा साहब जन्मजात संत और पैगंबर साहब के पवित्र वंश से हैं. उन्होंने एक मुख्य बिंदु पर बात करते हुए कहा कि बाबा ताजुद्दीन के पूर्वजों में ११ ऐसे महान बुजुर्ग शामिल हैं जो अपने समय के सर्वोच्च आध्यात्मिक गुरु थे.

**मुफ़्ती सलमान अजहरी की तकरीर आज**

बाबा ताजुद्दीन ट्रस्ट की जानिब से सालाना उर्स में कार्यक्रमों का सिलसिला जारी है. इसी क्रम में गुरुवार १६ जुलाई २०२६ को देश के प्रख्यात मुस्लिम धर्म गुरु मुफ़्ती सलमान अजहरी की तकरीर का कार्यक्रम आयोजित किया गया है. कार्यक्रम रात १० बजे ताजबाग के उर्स कार्यक्रम के शामियाने में आयोजित होगा. मुफ़्ती सलमान अजहरी बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के जीवन संदेशों पर प्रकाश डालेंगे.

## इंदोरा येथील जि प शाळेत वन महोत्सव अंतर्गत वृक्षारोपण




**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

मंगळवार (ता. १४ जुलै) रोजी गट ग्राम पंचायत इंदोरा व वन विभाग रामटेक प्रादेशिक यांच्या संयुक्त विद्यमान एक पेड़ मां के नाम वन महोत्सव या योजने अंतर्गत जिला परिषद उच्च प्राथमिक शाळा इंदोरा येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेणात आले. सदर कार्यक्रमाला बालचंद लोणारे क्षेत्र सहायक रामटेक, अभिजीत बाल्करवार वनरक्षक अड़ेगाव,कुमारी मीनाक्षी घोरपडे वनरक्षक असोली, नेकसिंग गहेरवार सरपंच ग्रट ग्राम पंचायत इंदोरा, नकुल लोनीया उपसरपंच ग्राम पंचायत इंदोरा, वीरेंद्र सेंगर, प्रतिभा नविनया, अरुणा कछवाह ग्राम पंचायत सदस्या, संध्या बन्सोड मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद बनर्जी, स्नेहा, स्वरूप केरवार वनरक्षक,वैभव सेंगर, सुरेंद्र खुलसाम, आरुष सेंगर, स्वयंम नकोरिया, प्रकाशिंग कछवाह व इतर मान्यवर उपस्थित होते.

## पिंपळदरा येथील खुजे कुटुंबाचा सामाजिक आदर्श; जिल्हा परिषद शाळेवर दानशूरतेचा वर्षाव

### पिढ्यानपिढ्या जपला समाजसेवेचा वारसा; विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोलाचे योगदान

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील पिंपळदरा हे सुमारे ४५० लोकसंख्या असलेले गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणारे छोटेसे गाव असले, तरी सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाप्रती असलेली निष्ठा यामुळे हे गाव वेगळा आदर्श निर्माण करत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शिक्षणाची सुविधा असून, या शाळेच्या विकासासाठी गावातील खुजे कुटुंबाने पिढ्यानपिढ्या समाजसेवेचा वारसा जपला आहे.



"गावात राहायचे असेल तर गावाचे काहीतरी देणे लागते," या भावनेतून दिवंगत श्री. उदेभान रघुजी खुजे यांनी आपल्या शेतातील मौल्यवान जागा जिल्हा परिषद शाळेसाठी दान करून शिक्षणसेवेचा भक्कम पाया रचला. त्यांच्या या कार्यामुळे शाळेला स्वतःची जागा उपलब्ध झाली आणि गावातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दालन खुले झाले.

याच सामाजिक संस्कारांचा वारसा पुढे नेत मुकुंद दादारावजी खुजे यांनी आपल्या आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ शाळेच्या संरक्षणासाठी समोरील कंपाऊंड व मुख्य प्रवेशद्वार (गेट) उभारून दिले. एवढ्यावरच न थांबता विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची जोड मिळावी, डिजिटल शिक्षणाचा लाभ व्हावा या उद्देशाने त्यांनी एक संगणकही शाळेला भेट दिला.

खुजे कुटुंबातील सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेले श्री. अमोलभाऊ खुजे यांनी आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नोटबुकचे वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन दिले. तर त्यांचाच वारसा पुढे नेत अतुलभाऊ खुजे यांनी कन्या कादंबरी हिच्या वाढदिवसानिमित्त शाळेसाठी रेड कार्पेट भेट देत विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांना हातभार लावला.

ग्रामीण भागात अनेक ठिकाणी शाळांना मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत असताना पिंपळदरा येथील खुजे कुटुंबाने कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता सातत्याने शाळेच्या विकासासाठी केलेले योगदान प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या कायार्मुळे गावातील विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या वातावरणात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली असून, इतर दानशूर व्यक्तींनाही सामाजिक उत्तरदायित्वाची प्रेरणा मिळत आहे.

गावातील नागरिक, पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी खुजे कुटुंबाच्या या उपक्रमांचे कौतुक करत, "शिक्षणासाठी दिलेले योगदान हीच समाजासाठी सर्वात मोठी गुंतवणूक आहे," अशा भावना व्यक्त केल्या आहेत. पिंपळदरा गावातील खुजे कुटुंबाने जपलेली ही समाजसेवेची परंपरा ग्रामीण भागासाठी निश्चितच एक आदर्श ठरत आहे.

थोडक्यात

## NAMASTE दिवस पर नागपुर महानगरपालिकाद्वारा सफाई कर्मियों के स्वास्थ्य एवं सुरक्षा हेतु विशेष कार्यक्रमों का आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

NAMASTE (National Action for Mechanized Sanitation Ecosystem) दिवस के अवसर पर नागपुर महानगरपालिका द्वारा सफाई कर्मियों के स्वास्थ्य, सुरक्षा एवं सम्मान को समर्पित विभिन्न विशेष कार्यक्रमों का आयोजन किया गया। महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्ता पक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे के मार्गदर्शन मे कार्य किया जा रहा है. नेहरू नगर जोन ५ के प्रभाग २८ स्थित दिघोरी शहरी प्राथमिक स्वास्थ्य केंद्र में सफाई कर्मियों के लिए निःशुल्क स्वास्थ्य जांच शिविर आयोजित किया गया। शिविर में चिकित्सकों द्वारा स्वास्थ्य परीक्षण एवं आवश्यक स्वास्थ्य परामर्श प्रदान किया गया। साथ ही सफाई कर्मियों को उनकी सुरक्षा के लिए हैंड ग्लव्स, फेस मास्क एवं सुरक्षा जैकेट वितरित किए गए।

इसी क्रम में लक्ष्मी नगर जोन १ एवं धरमपेठ जोन २ (रामदासपेठ, प्रभाग १५) में PIU टीम द्वारा जागरूकता एवं क्षमता विकास कार्यक्रम आयोजित किए गए। इस दौरान डी-स्लज मशीन का वीडियो एवं लाइव प्रदर्शन कर सुरक्षित एवं मशीनीकृत सीवर सफाई की प्रक्रिया का प्रदर्शन किया गया। सफाई कर्मियों को मैनहोल एवं सीवर लाइन में बिना सुरक्षा उपकरणों के प्रवेश से होने वाले जोखिमों, PPE किट के अनिवार्य उपयोग तथा कार्य के दौरान अपनाए जाने वाले सुरक्षा मानकों एवं प्रोटोकॉल की विस्तृत जानकारी दी गई। कार्यक्रम का मुख्य उद्देश्य सफाई कर्मियों के स्वास्थ्य, सुरक्षा एवं गरिमा को सुदृढ़ करना, मैनुअल सीवर सफाई को हतोत्साहित कर मशीनीकृत स्वच्छता प्रणाली को बढ़ावा देना तथा प्रत्येक सफाई कर्मी के लिए सुरक्षित एवं सम्मानजनक कार्य वातावरण सुनिश्चित करना है। नागपुर महानगरपालिका ने सभी सफाई कर्मियों से सुरक्षा मानकों का पालन करते हुए तकनीक आधारित एवं सुरक्षित स्वच्छता सेवाओं को अपनाने का आह्वान किया। उपस्थित अधिकारियों एवं सफाई कर्मियों ने इस पहल की सराहना करते हुए इसे सफाई कर्मियों के कल्याण की दिशा में एक महत्वपूर्ण कदम बताया।

## सार्वजनिक शौचालय ठिकाणी सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही लावा: महापौर निता ठाकरे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेतर्फे नागरिकांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालये, स्मार्ट टॉयलेट्स आणि आकांक्षी शौचालयांबाबत महापौर निता ठाकरे यांनी आज (ता.१५)मनपा मुख्यालयातील महापौर कक्षात आढावा बैठक घेतली. ज्या सार्वजनिक शौचालयांच्या परिसरात टवाळखोर महिलांना आत जाण्यास अडथळा निर्माण करत असतील, अशा लोकांविरुद्ध थेट पोलीस तक्रार करून कडक कारवाई करण्यात यावे तसेच, सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सर्व सार्वजनिक शौचालयांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे निर्देश महापौर यांनी दिले.

यावेळी बैठकीत उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्ष नेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनिषा अतकरे, कर आकरणी व कर संकलन विशेष समिती सभापती सरिता कावरे, उपसभापती सुनील हिरणवार, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण, प्रविण कोटांगळे, उपअभियंता सचिन चमाटे, देवेंद्र भोवते यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागपूर शहरातील विविध भागांत नागरिकांच्या सुविधेसाठी ३६ स्मार्ट टॉयलेट्स तयार करण्यात येणार आहेत. याचसोबत, शहरातील सध्याच्या सार्वजनिक शौचालयांच्या देखभालीचे व संचालनाचे काम मल्टीपर्पज, युनिव्हर्सल सर्विसेस, आर्यभट्ट सेवा, सुलभ इंटरनॅशनल आणि श्रीमो इत्यादी संस्थांद्वारे करण्यात येत आहे. याशिवाय, 'स्वच्छ भारत मिशन २.०' अंतर्गत फुटाळा, मानकापूर, मंगळवारी बाजार, हितवाद प्रेसजवळ, पारडी, गांधीबाग आणि सतरंजीपुरा अशा सात ठिकाणी 'आकांक्षी शौचालये' तयार करण्यात येत असल्याची माहिती मनपाचे कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण यांनी महापौर यांना दिली.

यावेळी महापौर निता ठाकरे यांनी शहरातील सर्व शौचालयांचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी शहरातील नादुरुस्त शौचालयांची अचूक संख्या सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. आवश्यकतेनुसार नादुरुस्त शौचालयांची तातडीने दुरुस्ती करण्यासह उद्याने, मैदाने व इतर सार्वजनिक ठिकाणच्या शौचालयांच्या योग्य देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, क्रीडा विभाग आणि उद्यान विभागाने परस्पर समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश त्यांनी दिले. शहरात मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक शौचालयांची नितांत गरज असून, बाजारपेठेच्या भागात जास्तीत जास्त शौचालये उभारून आवश्यकतेनुसार ती 'पे अँड युज' तत्त्वावर चालवण्याच्या सूचना त्यांनी केल्या. याशिवाय, पादचाऱ्यांना चालताना अडथळा होऊ नये म्हणून फुटपाथवर कुठेही टॉयलेट उभारू नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सध्या बंद असलेली शौचालये त्वरित सुरू करण्याचे त्यांनी दिले. याशिवाय त्यांनी सार्वजनिक जागा, मैदाने आणि उद्याने येथील सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती व नवीन बांधकाम झाल्यानंतर, नागरिकांना त्यांचा योग्य वापर करता यावा आणि त्यांचे सुयोग्य संचालन व्हावे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, क्रीडा विभाग व उद्यान विभागाने आपसात समन्वय ठेवून काम करण्याचे निर्देश दिले. तसेच, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी स्मार्ट टॉयलेट्सचे डिझाईन अधिक आकर्षक व सोयीस्कर करण्याच्या सूचना केल्या.

# 'एसआयआर'च्या वादात मुलांचे भवितव्य धोक्यात, शाळेत सापडेना शिक्षक

### शैक्षणिक सत्र २०२६-२७ ला कोरोनापेक्षाही जास्त शिक्षणाची वाट लागली

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे**

सध्या देशामध्ये काम एसआयआरचे कामे अधिक जोमात सुरू असल्याने स्थानिक जिल्हा परिषद शाळा व इतर खाजगी शाळा व शासकीय कामे पुन्हा मागे पडत आहेत. एसआयआरच्या नावावर जिल्हा परिषदेत शाळेत मुले आहेत परंतु शिक्षकच नसतील तर त्यांना शिक्षणाचे धडे कोण शिकवणार असा संत सवाले आता पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलेला आहे.

**गरीबांचे मुलं शैक्षणिक सत्र २०२६-२७ ला पार शिक्षकांना मुकलेच**

एसआयआरच्या नावावर कामासाठी आज जरी ३० जुलै अंतिम तारीख दाखविली जात असेल तरी मागील अनुभव पाहता ते काम या पावसाळ्यात पूर्ण कसं होईल, कारण आज पावसाने ज्या पद्धतीने हजेरी लावली त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी -शेतमजूर हा सकाळपासून सायंकाळपर्यंत शेतीच्या कामात आणि दिवसभर थकवा म्हणून लवकरच रात्र आराम करणे.

इकडे BLO- शाळा एकाच वेळी जरी दिसत नसले तरी त्या कामाला पुर्ण कसे करता येईल या धास्तीने द्विधा मनस्थितीत कार्य करणारे शिक्षक कर्मचारी कोणत्या वेळी मतदारांकडून



माहिती भरणार? प्रश्न तसाच उभा आहे.

त्यामुळे शाळाबाह्य झाले शिक्षक ना धड वर्गात ना धड शेतकरी - शेतमजूरात. यात कुठे कुठे ७-८ वर्ग विद्यार्थी आणि १-२ शिक्षक अध्यापनात. कुठे कुठे तर ५ वर्ग ० शिक्षक यामुळे गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम. समजा ही मुदत सप्टेंबर पर्यंत वाढली नाही तर नवलच.मग अर्धा शैक्षणिक सत्र गेला.

आता तिकडे जनगणना दुसरा टप्पा यात जे शिक्षक कर्मचारी BLO नाही ते जनगणनेच्या कामांवर. मग BLO शाळेवर येतील की परत SIR मधील चुका दुरुस्तीवर काही खरं नाही.पण समजा ते आता शाळेत तर जनगणनेच्या कार्यावर असलेले बाहेर पडले तर शाळेत परत कुठे कुठे ७-८ वर्ग विद्यार्थी आणि १-२ शिक्षक अध्यापनात.

**कुठे कुठे तर ५ वर्ग ० शिक्षक यामुळे गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम**

दुसऱ्या शैक्षणिक सत्राच्या शैक्षणिक कायार्चं काय? मग यातच काही महाभाग आहेत की शाळेव्यतिरिक्त काम करणे आहे हे सांगायला विसरणार नाहीत. मग तो कार्यकरणारा माणूस नाही मशिन आहे काय? कुठे आहे शैक्षणिक सत्र - कोण आहेत शिक्षणाला जबाबदार? शिक्षणापेक्षा शिक्षकांना इछड आणि रक्फ़ किती महत्त्वाची? शाब्बास! छान नियोजन यालाच म्हणतात! गेलं शैक्षणिक सत्र. शैक्षणिक सत्र २०२६-२७ ला कोरोना पेक्षाही जास्त शिक्षणाची लागली वाट! मग भविष्य पाहता शिक्षकांना शिकवू द्या - कमित कमी शिक्षक घ्या, आमचे शिक्षक परत करा मागणी चुकीची कशी? उघडा डोळे बघा बरोबर- निट नाही, मतदान -मतदातेच झाले - आहेत महत्वाचे. शाब्बास!!

BLO, SIR ची कामे ज्यांना एवढी सहज सोपी वाटतांना अू रुममध्ये बसून निर्णय घेण्याइतपतच ठिक आहे नाही तर आत्महत्या करण्याइतपत सदर काम करणाऱ्यांची हिम्मत कशी काय झाली असती.

आजपर्यंत शेतकरी -शेतमजूर यांची आत्महत्या ऐकली होती पण आता देशाचे भवितव्य घडविणारे शिक्षक आत्महत्या करीत आहेत याचे मंथन होणे गरजेचे आहे. टीईटीचा भूत ज्यांनी थोपविला ते तरी देशातील वातावरण पाहता शांत

जिल्हा परिषद शाळा ओस पडल्या असून महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये ३० जुलैपर्यंत सकाळ पाडीत शाळा सुरू झाल्याने त्यांचे शिक्षणाचे भवितव्य आतापासूनच धोक्यात आल्याचा धक्कादायक प्रकार सध्या शिक्षण विभागात सुरू आहे. आधीच यावर्षी पंधरा ते वीस दिवस शाळा उशिरा झाल्या ते सुद्धा त्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात गेले व आज पुन्हा शासन प्रशासन पुन्हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिक्षणापासून वंचित करण्याचे काम सध्या सत्तेत असणारे लोक करत आहेत. यावर्षी ऊन अधिक तापल्याने शाळा वीस दिवस उशिरा झाल्या पुन्हा एसआरच्या नावावर शासन प्रशासन त्यांच्या शिक्षणाशी खेळ करत असल्याचा आरोप पालक वर्गात शासन प्रशासना प्रतिरोस निर्माण करत आहेत. यामध्ये ३० ऑक्टोबर ही एसआर च्या कामाची अंतिम तारीख मानली जात आहे, परंतु यापूर्वीच शिक्षण विभागाने व शासनाने जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्याप्रती निराशा व्यक्त केली जात आहे.

झोप घेत असतील? गुरुवर्याच्या श्रापातून आजपर्यंत कोणी सुटला नसेल तर आज कसे सुटतील.

अजूनही वेळ गेली नाही तात्काळ निर्णय घ्या आणि ज्या गुरुवर्यांनी कोरोना काळात आपल्याही जीवाची पर्वा न करता वेगवेगळ्या प्रकारची सेवा दिली त्यांना टीईटीच्या भूतबंगल्यातून बाहेर काढा.

आज देशात अशा गुरुजनांनीच तयार केलेले शिष्य न्यायालयात नाही तर देशाच्या राजकारणासह समाजकारणात स्वतः ला वाहून घेणारे अधिकारी पदाधिकारी आहेत. गुरुदक्षिणा म्हणून त्यांच्या मानसिकतेवर परिणाम करणारी टीईटीच्या भूतासह अवांतर कामातून मुक्त करा. कोरोना काळापेक्षा विचित्र उद्भवलेली शिक्षण क्षेत्रातील अवदसा दूर करा. चुकीचे निर्णय थोपवून समाज मनात क्लेशमय वातावरण तयार करु नका.


विद्यार्थी शाळेत गुरुजी शोधत आहेत, गुरुजी विद्यार्थ्यांच्या पालकांना शोधत आहेत,पालक २००२ मध्ये आपापल्या वडिलांना शोधत आहेत, अधिकारी शिक्षक रक्फ़ वर आहे की नाही ते शोधत आहेत.पार वाट लावून टाकली तरी पालक शांत आहेत. किती भिती,कोणाची कशासाठी, ज्यांच्यामुळे एकही कर्मचारी नाही तो देवकार्य सांगून शिक्षणाचं वाटोळ होत असताना ही भारी दिसत आहे.

## जाम नदीतील शोधमोहीमेला यश; बेपत्ता सुरेश नागले यांचा मृतदेह सायंकाळी सापडला

### २४ तासांहून अधिक काळ सुरू असलेल्या शोधकार्यानंतर हाती लागला मृतदेह, आज होणार उत्तरीय तपासणी; जलालखेड्यात शोककळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील जाम नदीत मोटारपंपाचा केबल काढण्यासाठी नदीत उतरलेल्या युवकाचा अखेर मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. बेपत्ता असलेल्या सुरेश रामराव नागले (वय ३५, रा. जलालखेडा) यांचा मृतदेह बुधवारी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या दरम्यान शोध पथकाच्या हाती लागला. जवळपास २४ तासांहून अधिक काळ सुरू असलेल्या शोधमोहीमेनंतर मृतदेह सापडल्याने गावावर शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पावसाने दांडी मारल्यामुळे पिकांना पाणी देण्यासाठी जाम नदीत बसविलेला मोटारपंप सुरू करण्याचे काम सुरू होते. यावेळी मोटारपंपाचा केबल नदीत अडकल्याने पोहता येत असल्यामुळे सुरेश नागले याला नदीत उतरविण्यात आले. तो नदीपात्राच्या मध्यभागापर्यंत पोहत गेल्यानंतर अचानक दिसेनासा झाला. त्यानंतर स्थानिक मच्छीमार, महसूल विभाग, पोलिस प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू करण्यात आली.

रात्रभर शोधकार्य थांबवून बुधवारी सकाळपासून पुन्हा मोहीम सुरू करण्यात आली. नदीतील खोल पाणी, गाळ आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे शोधकार्याला अडथळे येत होते. अखेर सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास शोध पथकाला सुरेश नागले यांचा मृतदेह नदीपात्रात आढळून आला.

मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली असून उत्तरीय तपासणी गुरुवारी करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. उत्तरीय तपासणीनंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. घटनास्थळी तहसीलदार उमेश खोडके, ठाणेदार पवन बांभुळकर, महसूल व पोलिस विभागाचे अधिकारी-कर्मचारी, स्थानिक मच्छीमार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण शोधमोहीम प्रशासनाच्या देखरेखीखाली पार पडली.

या दुर्दैवी घटनेमुळे जलालखेडा गावात हळहळ व्यक्त होत असून सुरेश नागले यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कुटुंबाचा आधार हरपल्याने ग्रामस्थांकडून शासनाने तसेच संबंधितांकडून तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, सुरेश नागले यांच्या मृत्यूबाबत गावात विविध चर्चा सुरू असल्या तरी अधिकृत कारण उत्तरीय तपासणी अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## खुल्या चेंबरवर झाकणे प्राधान्याने लावा!

### महापौर निता ठाकरे यांचे लकडगंज झोनच्या बैठकीत निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पावसाळ्याचे दिवस लक्षात घेऊन सखल भागात पाणी साचणार नाही, तसेच गडरलाईनच्या खुल्या चेंबरवर त्वरित झाकणे लावण्यात यावे, असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले.

पावसाळ्यापूर्वी झोनमधील तयारीचा आढावा घेण्यासाठी महापौर प्रत्येक झोनमध्ये जाऊन लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांशी चर्चा करीत आहेत. याच मालिकेत महापौरांनी आज (ता. १५) लकडगंज झोन कार्यालयामध्ये नगरसेवक व झोनच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

या बैठकीला सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, लकडगंज झोनच्या सभापती माहेश्वरी बिसेन, आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे, शिक्षण समितीच्या सभापती संतोषदेवी लढ्ढा, मालमत्ता कर समितीच्या सभापती सरिता कावरे यांच्यासह उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सहाय्यक आयुक्त विजय थूल, कार्यकारी अभियंता सचिन रक्षमवार उपस्थित होते.

## ट्रकसह २१ लाखांच्या गॅस सिलिंडर चोरीप्रकरणाचा पर्दाफाश : एलसीबीकडून ३ आरोपी निष्पन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

पडोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी खुटाळा परिसरातून ट्रकसह २१ लाखांहून अधिक किमतीचे एचपी गॅस सिलिंडर चोरीला गेल्याच्या गाजलेल्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) यशस्वी उलगडा केला आहे. या प्रकरणात तीन आरोपींचा सहभाग निष्पन्न करण्यात पोलिसांना यश आले असून, त्यांच्या ताब्यातून चोरीतील बहुतांश मुद्देमाल तसेच सिलिंडर विकून मिळालेली रोकड जप्त करण्यात आली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फियार्दी वैभव विनोद खांडरे ४२ वर्ष रा. समाधी वॉर्ड, जेल रोड, चंद्रपूर) हे गॅस सिलिंडर वाहतूक व्यवसाय करतात. १२ जुलै २०२६ रोजी एमआयडीसी खुटाळा येथील गॅस बॉटलिंग प्लांटसमोरील रस्त्यावर उभा असलेला अशोक लेलंड कंपनीचा ट्रक क्र. एमएच- ३४ बीजी- १६०० अज्ञात चोरट्यांनी पळवून नेला होता. ट्रकमध्ये ३३२ घरगुती आणि १० व्यावसायिक (कमर्शियल) एचपी गॅस सिलिंडर भरलेले होते. ट्रकसह चोरीस गेलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत २१ लाख १४ हजार रुपये होती. याप्रकरणी पडोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखा आणि पडोली पोलिसांनी संयुक्तपणे तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि विविध पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी राजेंद्र रामचंद्र काळे वय ३२ वर्ष रा. बांढरी फाटा, पडोली, कुणाल सुभाष घुरुडे वय २० वर्ष रा. म्हाडा कॉलनी, दाताळा, चंद्रपूरआणि मोहित पोतदार रा. मुलचेरा, जि. गडचिरोली या तिघांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न केला.

आरोपींना ताब्यात घेऊन केलेल्या सखोल चौकशीत चोरीतील बहुतांश मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. आरोपींकडून ८२ भरलेले घरगुती एचपी गॅस सिलिंडर, २५० रिकामे घरगुती सिलिंडर, १० भरलेले कमर्शियल सिलिंडर तसेच चोरीचे सिलिंडर विकून मिळालेली २ लाख ४७ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, आणखी काही धागेदोरे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सपोनि. योगेश हिवसे सपोनि. दीपक कॉँक्रेडवार पोउनि. विनोद भुरले, पोउनि. सुनील गौरकार, पोउनि. देवानंद कैकान (पडोली पोलीस स्टेशन), तसेच पोहवा सुभाष गोहोकार, सतीश अवधरे, रजनिकांत पुठ्ठावार, दीपक डोंगरे, इमान खान, शरद कुडे, पोअं. हिरालाल गुप्ता, संदीप कांबडी, किशोर वाकाटे आणि शशांक बदामवार यांनी केले.

# बोगस बियाणे कंपन्यांचा सुळसुळाट

लीलाधर दवंडे
कामठी, जि. नागपूर

रोहिणी, हस्त आणि मृग सुद्धा कोरडा गेल्याने विदर्भातील शेतकरी आधीच हवालदिल झाले आहेत. त्यातच कर्जबाजारी होऊन विकत घेतलेले आणि तुरळक पाऊस पडल्यावर पुन्हा पाऊस येईल या आशेवर पेरणी केल्यानंतर जर पेरलेले बियाणे उगवलेच नाही तर तो माणूस गळ्याला फास घेणार नाही तर काय?

दिवसेंदिवस बोगस बियाणांचा फास इतका आवळला जात आहे की, आता शेती करावी की नाही करावी याच विवंचनेने शेतकऱ्यांना पछाडले आहे. घरीच बियाणे तयार करण्याची पूर्वापार पद्धत केव्हाच सरल्यात जमा झाली असल्याने शेतकऱ्यांना अशा महागड्या आणि विकतच्या बियाणांवर अवलंबून रहावे लागते. मात्र, आमचे बियाणे किती चांगले आहे, याची जाहिरात करणाऱ्या कंपन्याच जर शेतकऱ्यांची फसगत करत असतील तर शेतकऱ्यांनी कुठून आणलेलेबियाणे वापरावे? हा ज्वलंत प्रश्न मात्र कुणाच्याही ध्यानात न येणे म्हणजे शेतकऱ्यांच्या अधोगतीची सूचना आहे, असेच म्हणावे लागते. एकीकडे लहरी पर्जन्याने शेतकऱ्यांना वेठीस धरले आहे तर दुसरीकडे बोगस बियाणांच्या दृष्टचक्रात शेतकरी फसलेला आहे. याची वाच्यता विधानभवनाच्या भिंतींच्या आत व्हायला पाहिजे, यावर उपाययोजना व्हायला पाहिजे. मात्र, असे कुठलेच चित्र राज्याच्या राजकारणात दिसत नसल्याने स्वतःला शेतकऱ्यांचे कैवारी म्हणवून घेणारे पुढारी कुंभकर्णी झोपेत आहेत की काय, असे वाटायला लागले आहे.

नामांकित कंपन्यांचे बियाणे असून चांगले उगवतील या विश्वासाने सेलू तालुक्यातील रेहकी कला, सूरगाव, घोराड आणि महाबळा गावातील शेतकऱ्यांनी बुस्टर, रवी सीड्स, इनोवेज, किशोर सीड्स आदी नामांकित कंपन्यांचे सोयाबीन बियाणे वापरले. मात्र हजारो रुपये खर्च करूनही कुठे बियाणांची उगवण अत्यल्प झाली तर कुठे उगवलेच नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांकडे केली असल्याचे वृत्त नुकतेच वाचले असतांना अकोला जिल्ह्यात सोयाबीन बियाणांमध्ये फसवणूक झाल्याच्या तब्बल ९८४ शेतकऱ्यांनी तक्रारी केल्याचे भयानक वास्तव पुढे आले आहे. इतक्या मोठ्या संख्येने जर शेतकऱ्यांची फसवणूक सर्रास होत असेल तर या कंपन्यांना टाळे ठोकून त्यांची मालमत्ता जप्त करण्यात अधिकाऱ्यांना कुठली अडचण असावी?



मशागतीसाठी भर उन्हाळ्यात राबून शेती तयार करायची. मातीचं परीक्षण करायचं. पहिला पाऊस पडला नाहीतर पेरणीची तयारी करायची. त्यासाठी महागड्या मजुरांची जुळवाजुळव करायची. महागडे बियाणे घेऊन त्याची पेरणी करायची आणि त्या बियाणांनी अशी दांडी मारायची. हा फक्त बियाणांचा खर्च मातीमोल होणे नसून यामुळे शेतकऱ्यांचे अख्खे वर्ष वाया जात असते. वर्षभराचे नियोजन ढेपाळले जाते. मग, शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांनी वर्षभर काय खायचं आणि दुसऱ्या वर्षाचं नियोजन कसं करायचं? त्यातल्या त्यात कर्ज वाढलं की अवैध शाहूकारीचा फास गळ्याभोवती घट्ट आवळला जातो आणि शेतकरी मृत्यूची वाट धरायला लागतो. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी आभाळ गाठलं ते काही छंद म्हणून नव्हे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या मागे जी काही विविध कारणे आहेत, त्यापैकी महत्त्वाचे एक कारण म्हणजे या बियाणे कंपन्यांची फसवेगिरी म्हटले तरी ते खोटे ठरणारे नाही.

यंदा शेतकऱ्यांना बियाणांच्या २५ किलोच्या पिशवीकरिता ३,५०० ते ३,६०० रुपये खर्च करावे लागत आहेत. मात्र, हे बियाणेच नित्कृष्ट दर्जाचे निघत असतील तर शेतकरी शेती विकण्यास सरसावतील नाही तर काय? वाशीम जिल्ह्यात सुद्धा अशा तक्रारी वाढत असून तिथे तर महाबीज सह विविध कंपन्यांची बियाणे उगवलेच नसल्याच्या तक्रारी कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नोंदवत आहेत. मानोरा, मंगरूळ पीर, कारंजा लाड, रिसोड आदी ठिकाणांहून ३२ तक्रारी आतापर्यंत कृषी अधिकाऱ्यांना प्राप्त झाल्या आहेत. मूर्तिजापूरमध्ये सुद्धा काही शेतकरी संतप्त झाले आहेत. ज्यांना तक्रार करणे जमले नाही, ते वेगळेच.

नुकतेच राज्याचे कामगार मंत्री ना. अँड. आकाश फुंडकर यांनी खुद्द राज्याचे कृषिमंत्री दत्ताजी भरणे यांची भेट घेऊन शेगाव, खामगाव सह बुलढाणा जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबद्दल बीज उत्पादक कंपन्यांवर योग्य कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन त्यांना दिले. यावरून बियाणांच्या लुबाडणूकी बद्दल पुढारी अनभिज्ञ नाहीत तर काही निवडक सोडले तर त्यांना शेतकऱ्यांनी पिकविलेल्या अन्नाची लेणे देणे आहे, त्यांच्याशी नाही. अशीच गत आहे.

चांदुर बाजार तालुक्यात सुद्धा मोठ्या प्रमाणात फसवणुकीच्या तक्रारी पुढे येत असून शिवसेना (उबाठा) च्या वतीने कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देत अशा कंपन्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केलेली आहे. यावरून संपूर्ण विदर्भात फसवेगिरी करणाऱ्या बियाणे कंपन्यांनी धुमाकूळ घातल्याचे लक्षात यायला लागते. घाटंजी तालुक्यातील अंजी (नृ.) येथील शेतकरी ज्ञानेश्वर विठ्ठलराव वानखेडे यांनी सुद्धा अशाच फसवेगिरीची शेतकऱ्यांची व्यथा सर्वांपुढे मांडलेली आहे. आता तर आमदार बच्चू कडू यांनी शासनाला सरळ इशाराच दिला आहे. "जर बोगस बियाणे उत्पादित कंपन्यांवर कडक कारवाई केली नाही.तर, कार्यालये जाळून टाकणार" असा दम कडू यांनी दिला आहे. मात्र, या शेतकऱ्यांना न्याय मिळेल काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच आहे. सरकार शेतकऱ्यांची अल्पशी का असेना मदत करते, हे खरे असले तरी, ज्या कंपन्या आमचे बियाणे किती चांगले आहे, याच्या जाहिराती करतात. त्यांचे बियाणे उगवलेच नाही. तर, अशांनी संबंधित शेतकऱ्यांचा फक्त बियाणांचाच नाही तर मशागतीचा खर्च, मजुरांचा खर्च आणि शेतकऱ्यांच्या वर्षभराचा खर्च द्यायला हवा, असे विधायक बनविण्यास कुणी का धजत नाही? की इतर कंपन्यांसारखे बियाणे कंपन्या सुद्धा पार्टी फंडांची शिल्लक वाढवतात?

विदर्भ आणि मराठवाड्यातील दहा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अशा बोगस बियाणांचा फटका बसलेला आहे. याबाबत आतापर्यंत तब्बल राज्यात १८ कंपन्यांच्या विरुद्ध तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत.

मे महिन्यात सोलापूर जिल्ह्यात कृषी अधिकाऱ्यांनी धाडी टाकून १५ लाख ९९ हजार रुपये किंमतीचे बनावट उडीद बियाणे जप्त केले होते. अक्कलकोट आणि बार्शी तालुक्यातील या कारवाईत एकूण ८६४ बॅग बोगस बियाणे जप्त करण्यात आले होते. निर्मल सीड्सच्या बियाणांची नक्कल करून हे बोगस बियाणे विकण्यात येत होते. आता नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, ज्या शेतकऱ्यांचे बियाणे उगवलेच नाही. त्यांच्या शेताचे पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना मदत केल्या जाणार असल्याचे जाहीर केले आहे. ही शासनातर्फे केली जाणारी मदत असेल आणि केव्हा मिळेल तेही सांगता येणारी नाही. पण, कंपन्यांनी फसवणूक करायची आणि सरकारने त्याची फेडणी करायची. यापेक्षा अशा बनावट कंपन्यांवर कठोर कारवाई करायला हवी. त्यांच्याकडून शेतकऱ्यांची नुकसान भरपाई करवून घ्यायला हवी.

- ८४१२८७७२२०

# मैत्री असावी गारव्यासारखी...

डॉ.राजेंद्र विमल
रामहरी टेकाडे
पंचवटी, काटोल
जि. नागपूर

माणसाच्या आयुष्यात नाती अनेक असतात, पण त्यातील मैत्री हे नातं वेगळंच असतं. रक्ताचं नातं नसूनही मनाचं नातं जोडणारी मैत्री ही प्रत्येकाच्या आयुष्यात अपरिहार्य असते. बालपणापासून ते वृद्धापकाळापर्यंत माणसाला सतत एका अशा व्यक्तीची गरज भासते, जिच्यासमोर तो आपलं मन मोकळं करू शकतो, आपले विचार, भावना, सुख-दुःख न लपवता व्यक्त करू शकतो. हीच गरज मैत्री पूर्ण करते.

बालपणीची मैत्री निरागस असते. शाळेच्या मैदानावर खेळताना, डबा वाटून खाताना, अभ्यासात एकमेकांना मदत करताना जी मैत्री जुळते, ती पुढे आयुष्यभर टिकणारी असते. या वयात मैत्रीमध्ये कोणताही स्वार्थ नसतो, कोणतीही अपेक्षा नसते. पुढे तरुण वयात मैत्रीचं स्वरूप बदलतं. या टप्प्यावर व्यक्ती स्वतःची ओळख शोधत असते, अनेक मानसिक व भावनिक स्थित्यंतरांतून जात असते. अशा वेळी मित्रांचा आधार खूप महत्त्वाचा ठरतो. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिलं, तर या वयात व्यक्तीला आपल्या भावना समजून घेणारी, निर्णयक्षमतेत मदत करणारी आणि आत्मविश्वास वाढवणारी माणसं हवी असतात. हे काम मित्र चोख बजावतात.

मैत्री ही कोणत्याही लिंगभेदाच्या चौकटीत बांधलेली नसते. पुरुषाचा मित्र पुरुषच असावा किंवा स्त्रीची मैत्रीण स्त्रीच असावी, असा कोणताही आग्रह मैत्रीच्या मूळ भावनेला धरून नाही. स्त्री आणि पुरुष यांच्यामध्येही तितकीच निखळ, विश्वासार्ह आणि दीर्घकाळ टिकणारी मैत्री होऊ शकते. मैत्रीचा पाया हा लिंगावर नव्हे, तर विचारांची जुळणी, एकमेकांवरील विश्वास आणि परस्पर आदर यावर उभा असतो. त्यामुळे विरुद्धलिंगी व्यक्तींमधील मैत्रीकडे संशयाने पाहणे हे मानसशास्त्रीयदृष्ट्याही योग्य नाही. उलट, अशा मैत्रीमुळे दोन्ही बाजूंचा दृष्टिकोन अधिक व्यापक होतो, एकमेकांच्या भावना समजून घेण्याची क्षमता वाढते आणि व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ होते. त्यामुळे मैत्री जपताना ती केवळ स्त्री-पुरुष अशा चौकटीत न पाहता, ती किती प्रामाणिक आणि निखळ आहे, यालाच महत्त्व द्यायला हवे.



माणूस जेव्हा मानसिक ताणतणावातून जात असतो, तेव्हा त्याला सर्वात आधी आठवण येते ती मित्राची. कुटुंबातील माणसांसमोर काही गोष्टी बोलणं कधीकधी अवघड जातं, कारण त्यात अपेक्षा, जबाबदारी आणि काळजीचं ओझं असतं. पण मित्रासमोर मन मोकळं करताना कोणतंही दडपण नसतं. मानसशास्त्रात याला 'भावनिक विरेचन' असं म्हटलं जातं, म्हणजे मनातील साचलेल्या भावनांना वाट करून देणे. जेव्हा व्यक्ती आपल्या मनातील गोष्टी शब्दांत मांडते, तेव्हा तिच्या मनावरचा ताण नकळत कमी होतो. मित्र नुसतं ऐकून घेतो, समजून घेतो, आणि कधी कधी सल्लाही देतो. हे ऐकणं आणि समजून घेणं हेच खरं तर मानसिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असतं.

आयुष्यात संकट आलं की माणसाची खरी परीक्षा होते. अशा वेळी कोण आपल्यासोबत उभं राहतं, हे स्पष्ट दिसतं. आर्थिक अडचण असो, कौटुंबिक समस्या असो किंवा वैयक्तिक अपयश असो, संकटाच्या काळात मित्र हा भावनिक आधारस्तंभ बनतो. तो प्रत्यक्ष मदत करू शकत नसला, तरी त्याची उपस्थिती, त्याचे शब्द, त्याचा विश्वास माणसाला उभं राहण्याचं बळ देतात. संकटकाळात सामाजिक आधार असलेल्या व्यक्ती मानसिकदृष्ट्या अधिक स्थिर राहतात आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची त्यांची क्षमता वाढते. हा सामाजिक आधार सर्वात प्रभावीपणे मैत्रीतून मिळतो.खरा मित्र हा सुखाच्या क्षणी सोबत असतोच, पण दुःखाच्या क्षणी अधिक महत्त्वाचा ठरतो. सुखाचे साथीदार अनेक भेटतात, पण दुःखात साथ देणारे मोजकेच असतात. अशा मित्राची तुलना गारव्याशी करता येईल.जसा उन्हाच्या तीव्रतेनंतर सावली दिलासा देते, तसाच मित्र मनाला शांतता देतो. पण मैत्री ही नेहमीच सरळ, सोपी नसते. कधी गैरसमज होतात, कधी भांडणं होतात, कधी वाद होतात. दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वं एकत्र येतात, तेव्हा मतभेद होणं स्वाभाविक आहे. पण खऱ्या मैत्रीचं वैशिष्ट्य हेच असतं की, भांडण झालं तरी नातं तुटत नाही.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, नात्यांमधील संघर्ष हा नात्याच्या अंताचं कारण नसतो, तर तो नातं अधिक घट्ट करण्याची संधी ठरते. भांडणानंतर जेव्हा दोन मित्र पुन्हा एकत्र येतात, समजूत काढतात, एकमेकांची बाजू समजून घेतात, तेव्हा त्यांच्यातील विश्वास आणखी दृढ होतो. रागाच्या भरात बोललेले शब्द विसरून पुन्हा हसतमुखाने भेटणं, हीच खरी मैत्रीची कसोटी असते. ज्या मैत्रीत क्षमा करण्याची, समजून घेण्याची आणि पुन्हा जवळ येण्याची तयारी असते, तीच मैत्री दीर्घकाळ टिकते.

शाळेत आणि महाविद्यालयात जुळलेली जिवलग मैत्री ही सर्वात निखळ आणि खोल असते. पण पुढे लग्न झाल्यावर, संसाराच्या जबाबदाऱ्यांमध्ये गुंतल्यावर अनेकदा या मैत्रीत नकळत अंतर पडतं. रोजच्या धावपळीत, नोकरी-व्यवसायाच्या व्यापात आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये मित्रांसाठी वेळ काढणं कठीण होत जातं. हा दुरावा कोणाच्याही इच्छेने घडत नाही, तो परिस्थितीमुळे नकळत निर्माण होतो. मात्र हा दुरावा कायमचा राहू नये, यासाठी ठराविक काळाने प्रयत्नपूर्वक प्रयत्न करणं आवश्यक असतं. कौटुंबिक गेट-टुगेदरसारखे कार्यक्रम, जुन्या मित्र-मैत्रिणींचे स्नेहसंमेलन किंवा साधी एकत्र भेटण्याची बिसी सारखी योजना यामुळे ही मैत्री पुन्हा ताजी होते. अशा भेटीत मनमोकळ्या गप्पा होतात, जुन्या आठवणींना उजाळा मिळतो आणि नात्यातील ओलावा पुन्हा जागा होतो. आपल्या जुन्या मित्र-मैत्रिणींचा एक चांगला मित्रपरिवार जपणं आणि तो वृद्धिंगत करण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न करणं, हे केवळ वैयक्तिक आनंदासाठीच नव्हे, तर कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्यासाठीही महत्त्वाचं असतं. अशा एकत्र येण्यातून पुढच्या पिढीलाही नात्यांचं मूल्य आणि मैत्रीचं महत्त्व शिकायला मिळतं.

भावनिक आधाराच्या दृष्टीने विचार केला, तर मित्र हा केवळ वेळ घालवण्याचं साधन नसतो, तर तो एक असा आरसा असतो. ज्यात माणूस स्वतःला अधिक स्पष्टपणे पाहू शकतो. मित्र आपल्यातील उणिवा प्रेमाने दाखवतो, चुका सुधारण्यास मदत करतो आणि योग्य वेळी परखड बोलण्याचं धाडसही दाखवतो. ही स्पष्टवक्ता मैत्रीच माणसाला आयुष्यात योग्य दिशेने पुढे नेण्यास मदत करते.

आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मैत्रीचं महत्त्व अधिकच वाढलं आहे. एकाकीपणा, नैराश्य यांसारख्या मानसिक समस्या वाढत असताना, मित्रांशी नियमित संवाद, भेटीगाठी आणि भावनिक देवाणघेवाण माणसाचं मानसिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे मैत्री जपणं, ती वेळोवेळी जोपासणं, आणि त्यासाठी वेळ काढणं ही काळाची गरज बनली आहे.

मैत्री हे एक असं नातं आहे जे माणसाला केवळ सोबतच देत नाही, तर त्याच्या मनाला स्थैर्य, आधार आणि आत्मविश्वास देखील देतं. भांडणं, वाद, गैरसमज हे मैत्रीचा भाग असले, तरी त्यातून पुन्हा एकत्र येण्याची ओढ हीच मैत्रीची खरी ताकद असते. मैत्री ही लिंगभेद न मानता, कोणत्याही वयात, कोणत्याही टप्प्यावर जपली गेली पाहिजे आणि जुन्या मैत्रीतील दुरावा कमी करण्यासाठी कौटुंबिक भेटीचे प्रयत्न सातत्याने केले पाहिजेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आयुष्यात अशा मित्रांची जपणूक करावी, जे संकटकाळात आधार देतील, आनंदात सहभागी होतील आणि मतभेद झाले तरी पुन्हा हात पुढे करतील. अशी मैत्री हीच खऱ्या अर्थाने आयुष्याला समृद्ध करणारी संपत्ती असते.

- ९१४५७७९०५०

# फ्रेंच क्रांती: समष्टिवादाची प्रेरणा!

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

विश्वबंधुत्व म्हणजे जगामध्ये स्वातंत्र्य व समता यांवर विश्वास असणारे व ती तत्त्वे अंमलात आणण्यासाठी झगडणारे सर्व लोक, मग ते कोणत्याही देशांतील असोत ते एकमेकांचे बंधू आहेत. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व आणि जनतेचे सार्वभौमत्व या कल्पनांचा प्रसार सशस्त्र क्रांतीपूर्वी वैचारीक क्रांती करणाऱ्या फ्रेंच तत्ववेत्त्यांनी आपल्या लेखनाद्वारे केला होता. क्रांतीने या कल्पना साकार करण्याचा रांगडा धसमुसळेपणाचा रांगडा प्रयत्न केला. क्रांतीला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले, ते युरोपीय जनतेमुळे नव्हे तर फ्रेंच सैन्यामुळे!

फ्रेंच राज्यक्रांती म्हणजे फ्रान्समध्ये इ.स.१७८९ ते इ.स.१७९९ या कालखंडात घडून आलेली सामाजिक व राजकीय उलथापालथ होय. या घटनाक्रमाने फ्रान्स व उर्वरित युरोपच्या इतिहासास कलाटणी दिली. अनेक शतके फ्रान्सवर राज्य केलेली अनियंत्रित राजेशाही राज्यक्रांतीच्या तीनच वर्षांमध्ये उलथून पडली. कट्टर डाव्या विचारसरणीच्या राजकीय गटांच्या, रस्त्यावर उतरलेल्या लोकशक्तीच्या व शेतकऱ्यांच्या एकत्रित रेट्यामुळे फ्रेंच समाजावरचा सरंजामशाहीवादी, धर्मशास्त्रप्रणीत मूल्यव्यवस्थेचा पगडा ओसरून समाजात मोठे पुनरुत्थान घडून आले. जुन्या रूढीगत परंपरा, तसेच राजेशाही, सरंजामशाही, धर्मसत्ता यांच्या योगे रुजलेल्या सामाजिक कल्पना व उतरंडीची व्यवस्था झुगारून दिल्या गेल्या व त्यांच्या जागी समता, नागरिकत्व, आणि मानवी हक्क ही प्रबोधक मूल्ये अंगिकारली गेली. या काळात मॉन्टेस्क्यू या विचारवंताने सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला होता. तसेच फ्रान्समधील अनियंत्रीत राजेशाही व्यवस्था सदोष असल्याने ती बदलणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. त्याच्या विचारांचा प्रभाव फ्रान्समधील बुद्धिवादी लोकांवर मोठ्या प्रमाणात पडला होता. जॉ जॅकवेस रुसो यांना फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक म्हणून संबोधले जाते. इ.स.१७८९च्या मे महिन्यात भरलेल्या ल एता-जेनेरो अर्थात समाजातील पुरोहित, सरंजामदार महाजन व सामान्यजन अशा तीन इस्टेटींच्या, सर्वसाधारण सभेमधून क्रांतीची ठिणगी पडली. जून महिन्यात तिसऱ्या इस्टेटीने टेनिस कोर्टावर प्रतिज्ञा घेतली; तर जुलै महिन्यात बॅस्तिये किल्ल्याचा पाडाव झाला. ऑगस्ट महिन्यात मानवाच्या व नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकारण्यात आला. ऑक्टोबर महिन्यात इतिहासप्रसिद्ध झालेल्या व्हर्सायवरच्या मोर्च्याने राजदरबाराला पॅरिसला परतण्यास भाग पाडले. पुढील काही वर्षे विविध मुक्तिवादी गट आणि परिवर्तनवादी प्रयत्नांना हाणून पाडू पाहणारी दक्षिणपंथी राजसत्ता यांच्यादरम्यान संघर्ष घडतच राहिले.

**क्रांतीचे परिणाम व महत्व**

स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व ही तत्वत्रयी वरील क्रांतीकारक सुधारणांची प्रेरणा होती. त्यांच्या जोडीला क्रांतीने जनतेच्या सार्वभौमत्वाची घोषणा केली होती. ही तत्वत्रयी क्रांतीच्या काळात सार्वजनिक इमारतींवर झळकत असे. नेपोलियनने हुकूमशाही प्रस्थापित केल्यावरही ती शब्दावली न पुसता तशीच ठेवण्यात आली. स्वातंत्र्यामध्ये भाषण, लेखन, प्रकाशन तसेच धार्मिक आणि खाजगी मालमत्तेचे स्वातंत्र्य ह्या गोष्टी अभिप्रेत होत्या. समतेमध्ये सरदारवर्गाची व तिच्यामधील खास अधिकारांची समाप्ती, सर्व नागरिकांस वर्गनिरपेक्ष समान संधी व कायद्याच्या बाबतीत समानता या गोष्टी अंतर्भूत होत्या.

विश्वबंधुत्व म्हणजे जगामध्ये स्वातंत्र्य व समता यांवर विश्वास असणारे व ती तत्त्वे अंमलात आणण्यासाठी झगडणारे सर्व लोक, मग ते कोणत्याही देशांतील असोत ते एकमेकांचे बंधू आहेत. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व आणि जनतेचे सार्वभौमत्व या कल्पनांचा प्रसार सशस्त्र क्रांतीपूर्वी वैचारीक क्रांती करणाऱ्या फ्रेंच तत्ववेत्त्यांनी आपल्या लेखनाद्वारे केला होता. क्रांतीने या कल्पना साकार करण्याचा रांगडा धसमुसळेपणाचा रांगडा प्रयत्न केला.

क्रांतीला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले, ते युरोपीय जनतेमुळे नव्हे तर फ्रेंच सैन्यामुळे! फ्रान्सबाहेर क्रांती मानली न जाता लादली गेली होती. तत्त्वापेक्षा परिस्थितीच्या गरजेचा प्रभाव त्यांच्या कृतीवर जास्त पडला होता. सामाजिक समतेवर अशा प्रकारच्या लोकशाहीची व सामाजिक न्यायाची कल्पना यूरोपीय विचारांमध्ये कायमची दृढमूल झाली. पुढील इतिहासावरून ही कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे प्रयत्न युरोपात व अन्यत्र झालेले दिसून येतात आणि आधुनिक युगातही ते पुढे चालू आहेत. तसेच या काळात गरजेच्या पोटी किंमतीवर नियंत्रण आणणे, खासगी मालमत्ता ताब्यात घेणे, यांसारख्या ज्या काही गोष्टी क्रांतिकालीन शासनांना कराव्या लागल्या त्यांमधून काही विचारवंतांना समष्टिवादाची प्रेरणा मिळाली.

क्रांतीकारकांचे बंधुत्व व आंतरराष्ट्रीय एकात्मता जगाच्या निदर्शनास आणण्यासाठी फ्रेंच नेता लाफायेत याने बॅस्तिलच्या किल्ल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यास देण्यासाठी इंग्लिश क्रांतीकारक टॉमस पेन याच्या हवाली केल्या. टॉमस पेन व जेरेमी बेंथॅम यांस फ्रान्सने नागरिकत्वाचे हक्क दिले. क्रांतीची तत्वे व वरील घटना यांचा विचार करता फ्रेंच राज्यक्रांतीची बैठक आंतरराष्ट्रीय स्वरूपाची होती, हे लक्षात येते.

- ९४२३७१४८८३